दैनिक
जनप्रभात
सामाजिक परिवर्तनाचा बुलंद आवाज
मुख्य संपादक :- राहुल गजरे
कार्यकारी संपादक :- अवधूत शेंद्रे

*(आठवी) वर्षा *रविवार, ४ ऑक्टोबर २०२६ *वर्ष ४ थे *अंक २४३ *पृष्ठ ६ *मुल्य ५.०० RNI No.: MAHAR/2022/82242

पोरवाल कॉलेजात राष्ट्रपिता महात्मा गांधी व लाल बहादुर शास्त्री जयंती साजरी



कामठी/ दिलीप येवले

स्थानिक सेठ केसरिमल पोरवाल महाविद्यालयाच्या विशेष दिवस कार्यक्रम समितीतर्फे, राष्ट्रपिता महात्मा गांधी व माजी प्रधानमंत्री लाल बहादुर शास्त्री यांची जयंती उत्साहात साजरी करण्यात आली. कार्यक्रमाची सुरवात महात्मा गांधी व लाल बहादुर शास्त्री यांच्या तैलचित्राला माल्यार्पण व पुष्पांजली वाहून करण्यात आली. विशेष दिवस कार्यक्रम समितीचे समन्वयक व इतिहास विभाग प्रमुख डॉ. जितेंद्र सावजी तागडे यांनी राष्ट्रपिता महात्मा गांधीजींची ग्राम स्वराज्याची संकल्पना व शास्त्रीजींची भारत-पाक (१९६५) युद्धातील कणखर भूमिका विषद केली. महाविद्यालयाचे प्राचार्य व कार्यक्रम अध्यक्ष प्रा. डॉ. स्वप्नील दाहात यांनी राष्ट्रपिता व शास्त्रीजींच्या जीवन कार्यातून समर्पण व राष्ट्र सर्वोपरीचे गुण घेण्यास सांगितले. याप्रसंगी उपप्राचार्य डॉ. इफ्तेखार हुसेन, आय.क्यू.ए.सी. समन्वयक डॉ. प्रशांत थोगडे, प्रा. डॉ. जयंत रामटेके, प्रा. डॉ. सिद्धार्थ मेश्राम, डॉ. विनोद शेंडे, डॉ. सुदीप मोंडल, डॉ. महेश जोगी, डॉ. विनोद कांबळी, डॉ. समृद्धी टापरे, डॉ. प्रियंका भोयर, ग्रंथपाल शिल्पा हिरेखण, प्रा. धम्मदिना बोरकर, प्रा. नगरारे मॅडम, प्रा. वासनिक मॅडम आणि विद्यार्थ्यी उपस्थित होते.

दुष्काळाचा ट्रिगर वन लागू झाल्यानंतर पंचनाम्यांच्या प्रक्रियेला वेग

जिल्ह्यात ३९ हजार हेक्टर क्षेत्रातील पंचनामे पूर्ण - १९ हजार ६१ खातेदारांचा समावेश



वर्धा : वर्धा जिल्ह्यात खरीप हंगामात ३ लाख ७७ हजार ९९७.६१ हेक्टर क्षेत्रावर विविध पिकांची पेरणी झाली होती. या क्षेत्राशी संबंधित २ लाख २ हजार ८३८ खातेदार असून जिल्ह्यातील १ हजार २६८ गावे आहेत. यावर्षी खरीप हंगामात दुष्काळी परिस्थिती निर्माण झालेली आहे. पावसाचा मोठा खंड तसेच पावसाची मोठी तुट याचा परिणाम पिकांवर झालेला आहे. कपाशी, सोयाबीन, तूर आदी पिकांचे मोठ्या प्रमाणात नुकसान झाले आहे. सोयाबीनच्या शेंगा भरल्या असून दाण्यांचा आकार अतिशय छोटा आहे. कपाशीलाही बोंडांची संख्या कमी असून उत्पादनात मोठी घट येण्याची परिस्थिती आहे. दुष्काळी स्थितीमुळे उत्पादन खर्च भरून निघण्याची शक्यता नाही. दुष्काळी परिस्थितीच्या पार्श्वभूमिवर खरीप हंगाम २०२६ मध्ये जिल्ह्यातील सात तालुक्यांमध्ये दुष्काळाचा ट्रीगर वन लागू झाला आहे. दुष्काळी परिस्थितीमुळे पिकांचे नुकसान झाल्याने प्रशासनाने पंचनाम्यांची प्रक्रिया सुरू केली आहे. जिल्ह्यातील वर्धा, सेलू, देवळी, आर्वी, आष्टी, हिंगणघाट आणि समुद्रपूर या तालुक्यांमध्ये पंचनाम्याचे काम सुरू आहे.

जिल्ह्यात खरीप हंगामात पावसाचा मोठा खंड आणि पावसाची मोठी तुट यामुळे पिकांचे मोठ्या प्रमाणात नुकसान झाले आहे. २०२६ च्या हंगामात दुष्काळी परिस्थितीचा सामना करणाऱ्या वर्धा जिल्ह्यात शासनाच्या 'ट्रिगर-१' अंतर्गत पीक नुकसानीच्या पंचनाम्यांना वेग आला आहे. जिल्ह्यातील सात तालुके ट्रिगर-१ अंतर्गत पात्र ठरले असून, २ ऑक्टोबरपर्यंत उपलब्ध माहितीनुसार ९१६ गावांतील ३८ हजार ८२४.७५ हेक्टर क्षेत्रातील पंचनामे पूर्ण झाल्याची माहिती आहे. या प्रक्रियेत सुमारे १९ हजार ६१ खातेदारांचा समावेश झाला आहे. लवकरच पंचनाम्यांची प्रक्रिया दिलेल्या वेळेत पूर्ण करण्यात येईल, असा विश्वास व्यक्त करण्यात येत आहे.

वर्धा तालुक्यात १५६ गावांत ५८१३७.८० हेक्टर क्षेत्र लागवड असून ३०१६७ खातेदार आहेत. सेलू तालुक्यात १७१ गावांत ४६६४०.८० लागवड क्षेत्र असून २६२१७ खातेदार आहेत. देवळी तालुक्यात १५२ गावांत ५५०३९.५० हेक्टर क्षेत्रात लागवड असून २९७५२ खोतेदार आहेत. आर्वी तालुक्यात २२१ गावांमध्ये ४७४७० हेक्टर क्षेत्र असून २८४३६ खातेदार आहेत. आष्टी तालुक्यात १५८ गावात २२९५०.५० हेक्टर क्षेत्र असून १६७९३ खातेदार आहेत. हिंगणघाट तालुक्यात १८८ गावांत ७६४५४ हेक्टर लागवड असून ३५५४३ खातेदार संख्या आहेत. समुद्रपूर तालुक्यात २२२ गावे ७२३०५.०१ हेक्टर क्षेत्र लागवडीचे असून ३६११० खातेदार संख्या आहे.

-- पंचनाम्यांची २ ऑक्टोबरची स्थिती बघता जिल्ह्यात ९१६ गावांमध्ये ३८८२४.७५ हेक्टर क्षेत्रातील पीक पंचनामे पूर्ण झाले आहेत. या खातेदारांची संख्या १९०६१ आहे. आर्वी तालुक्यात १८५ गावांत १४ हजार ५३६ हेक्टर क्षेत्राचे पंचनामे पूर्ण झाल्याची नोंद आहे. देवळी तालुक्यात ६० गावांत ३ हजार ९४२ हेक्टर, सेलू तालुक्यात १२१ गावांत २ हजार ८९.५६ हेक्टर, आष्टीत ७३ गावांत १ हजार ३३३.४ हेक्टर क्षेत्रातील पंचनामे पूर्ण झाले आहेत. हिंगणघाट तालुक्यात १५८ गावांत ६६९४.२१ आणि समुद्रपूर तालुक्यात १८१ गावांत ७३८६.३ हेक्टर क्षेत्रातील पंचनाने पूर्ण झाल्याची माहिती आहे. ट्रिगर-१ लागू झाल्यानंतर नुकसानग्रस्त क्षेत्राचे वस्तुनिष्ठ मूल्यांकन करण्याची प्रक्रिया वेगान करण्यात येत आहे.

-- वर्धा तालुक्यातही दुष्काळी स्थितीतील पिकांचे पंचनामे पूर्ण करण्याची प्रक्रिया वेगाने सुरू आहे. कृषी, महसूल आणि ग्रामविकास विभागाच्या वतीने संयुक्तपणे पंचनामे करण्यात येत आहे. पवनार शिवारात तहसीलदार संदीप पुंडेकर यांनी थेट बांधावर पोहोचून पंचनाम्यांची माहिती घेतली. यावेळी कृषि, महसूल, ग्रामविकास विभागाचे कर्मचारी, पंच आदींची उपस्थिती होती.

नऊ जखमी सावंगी (मेघे) रुग्णालयात भरता

समृद्धीवरील अपघातप्रकरण, ११ जणांना रुग्णालयातून सुटी

वर्धा : समृद्धी महामार्गावर घडलेल्या भीषण अपघातात वर्ध्यातील सात जणांचा मृत्यू तर १९ जण जखमी झाले होते. जखमींना सावंगी (मेघे) येथील रुग्णालयात उपचारार्थ दाखल करण्यात आले. प्रकृतीत सुधारणा झाल्यानंतर सुमारे ११ रुग्णांना रुग्णालयातून सुटी देण्यात आली. सध्या नऊ जखमी रुग्णालयात उपचारासाठी भरती असल्याची माहिती मिळते.

वर्ध्याच्या सिंदी (मेघे) येथील सोमनाथे ले आऊटमधील युवा नवदुर्गा पूजा उत्सव समितीचे कार्यकर्ते शेगाव येथून दुर्गा मातेची मूर्ती वर्ध्याला आणत होते. समृद्धी महामार्गावर प्रवास सुरू असताना धामणगाव ते पुलगाव दरम्यान टृकने जोरदार धडक दिली. या अपघात सात भाविकांचा मृत्यू झाला. १९ जणांना सावंगी (मेघे) येथील रुग्णालयात उपचारार्थ दाखल करण्यात आले. एका रुग्णाची प्रकृती गंभीर असल्याने त्याला नागपूर येथील रुग्णालयात उपचारार्थ दाखल करण्यात आले. सावंगी (मेघे) रुग्णालयातून ११ रुग्णांना सुटी देण्यात आली. सध्या दिनेश नानोटे, सतीश राऊत, दिनेश पोहनकर, अमित आडे, प्रणय ढोले, अनिल मेश्राम, यश मलकापुरे, नरेंद्र सायम, प्रतिक सिरस्कर या जखमींवर रुग्णालयात उपचार सुरू आहेत.

स्वच्छता ही सेवा अभियान: पिपरी ग्रामपंचायतीत 'एक तारीख, एक तास, एक साथ' अंतर्गत महा श्रमदान मोहीम

कारला चौक ते जुनापाणी चौक परिसराची स्वच्छता अधिकारी, नागरिक आणि हिंदी विश्वविद्यालयाच्या विद्यार्थ्यांचा मोठा सहभाग



वर्धा : जिल्ह्यात १७ सप्टेंबर ते २ ऑक्टोबर २०२६ या कालावधीत 'स्वच्छता ही सेवा २०२६' हे अभियान अत्यंत उत्साहात राबविण्यात येत आहे. या अभियानांतर्गत दररोज विविध उपक्रमांचे आयोजन केले जात असून, आज दिनांक १ ऑक्टोबर २०२६ रोजी सकाळी ठीक ८:०० वाजता वर्धा तालुक्यातील ग्रामपंचायत पिपरी येथे 'एक तारीख, एक तास, एक साथ' या राष्ट्रीय उपक्रमांतर्गत 'महा श्रमदान' मोहीम राबविण्यात आली. कारला चौक ते जुनापाणी चौक या दरम्यान राबविलेल्या या मोहिमेत नागरिकांनी आणि विद्यार्थ्यांनी उस्फुर्त सहभाग नोंदवला.

या महा श्रमदान मोहिमेप्रसंगी वर्धा पंचायत समितीचे गटविकास अधिकारी समर्थ शेवाळे, जिल्हा परिषद ग्रामपंचायत विभागाच्या सहाय्यक गटविकास अधिकारी शितल हिवराळे, पिपरी ग्रामपंचायतच्या सरपंच सौ. वैशाली गौळकर, तसेच उपसरपंच श्री. गजानन वानखडे यांची प्रामुख्याने उपस्थिती होती. या मोहिमेत जिल्हास्तरावरून पाणीपुरवठा व स्वच्छता विभागाचे अधिकारी सर्वश्री सचिन खाडे, विनोद खोब्रागडे, नरेंद्र येनोरकर, मनोज डेकाटे, महेश डोईजोड आणि पंचायत समिती स्तरावरून अरविंद बलवीर, श्रीमती प्रणिता कोरडे यांनी प्रत्यक्ष सहभागी होऊन श्रमदान केले.

तसेच पिपरी ग्रामपंचायतचे सदस्य श्री. अजय गौळकर, श्री. प्रदिप रौंदळे, श्री. वैभव चाफले, माजी सदस्य श्री. प्रशांत खंडारे आणि ग्रामपंचायत अधिकारी श्री. सी. एस. वधले यांच्यासह ग्रामपंचायत कर्मचारी पवन दामडे, विपुल शिंदे, सचिन देवहारे, रमेश गुळभेळे, विशाल नरताम, रितेश सावरकर, सुरेश नेहारे, रोशन धुमाळे, अजय जाधव आणि रामदास चंदीवाले यांनी परिसराची स्वच्छता करण्यासाठी विशेष परिश्रम घेतले.

हिंदी विश्वविद्यालयाच्या विद्यार्थ्यांचे विशेष योगदान

या महा श्रमदान मोहिमेचे मुख्य आकर्षण म्हणजे परिसरातील महात्मा गांधी आंतरराष्ट्रीय हिंदी विश्वविद्यालयातील विद्यार्थ्यांनी दर्शवलेली मोठी उपस्थिती होती. राष्ट्रपिता महात्मा गांधी यांच्या स्वच्छता संदेशाचे अनुकरण करत विद्यार्थ्यांनी संपूर्ण परिसरात झाडू मारून आणि कचरा गोळा करून श्रमदानात मोठे योगदान दिले. गावातील शेकडो नागरिकांनीही या मोहिमेत स्वतःला झोकून देऊन आपला परिसर चकाचक केला. २ ऑक्टोबर रोजी अभियानाचा समारोप होत असून, या पार्श्वभूमीवर आजची मोहीम अतिशय यशस्वी ठरल्याचे प्रशासनाकडून सांगण्यात आले.

कारंजाच्या शेतकऱ्यांवर अन्याय सहन करणार नाही; खासदार अमर काळे यांचा सरकारला इशारा



कारंजा : कारंजा तालुका सन २०२६च्या दुष्काळग्रस्त यादीतून वगळण्यात आल्याच्या निषेधार्थ तसेच शेतकऱ्यांना तातडीने मदत, सरसकट कर्जमाफी आणि वाघाच्या हल्ल्यात मृत्यू झालेल्या कुटुंबीयांना एक कोटी रुपयांची आर्थिक मदत देण्याच्या मागणीसाठी महाविकास आघाडीच्या वतीने खासदार अमर काळे यांच्या नेतृत्वात कारंजा येथील अमरावती-नागपूर महामार्गावरील नारा टी-पॉइंट येथे गुरुवारी आंदोलन करण्यात आले.

सकाळी ११ वाजता सुरू झालेले हे आंदोलन दुपारी २.३० वाजेपर्यंत तब्बल चार ते पाच तास सुरू होते. यावेळी शेतकरी, विविध संघटनांचे पदाधिकारी, कार्यकर्ते आणि नागरिक मोठ्या संख्येने सहभागी झाले. विशेष म्हणजे या आंदोलनात महिला नेत्या सौ. मयुराताई काळे, सौ हर्षाताई बेलखोडे यांचे सह बऱ्याच महिला रखरखत्या उन्हाची पर्वा न करता रस्ता रोको आंदोलनात मोठ्या हिरीरीने सहभागी झाल्या होत्या सरकारच्या शेतकरीविरोधी धोरणांविरोधात जोरदार घोषणाबाजी करत कारंजा तालुक्याला दुष्काळग्रस्त यादीत वगळण्याच्या निर्णयावर तीव्र नाराजी व्यक्त केली. नैसर्गिक संकटांचा सामना करणाऱ्या शेतकऱ्यांना शासनाने मदतीचा हात देण्याऐवजी दुष्काळग्रस्त यादीतून वगळणे हा शेतकऱ्यांवर अन्याय असल्याचे त्यांनी सांगितले.

कारंजा तालुक्याचा तातडीने दुष्काळग्रस्त यादीत समावेश करून शेतकऱ्यांना शासनाच्या सर्व दुष्काळी सवलती व मदत मिळवून द्याव्या, शेतकऱ्यांची सरसकट कर्जमाफी करावी आणि संकटग्रस्त शेतकऱ्यांना तातडीने आर्थिक मदत द्यावी, अशी मागणी त्यांनी केली.

रायपूर-उंगलीतील वाघाच्या हल्ल्यात मृत्यू झालेल्या घटनेवरून पालकमंत्र्यांवर टीका वाघाच्या हल्ल्यात मृत्यू झालेल्या व्यक्तीच्या कुटुंबीयांच्या प्रश्नावरूनही खासदार अमर काळे यांनी सरकार आणि पालकमंत्र्यांवर जोरदार टीका केली.

रायपूर-उंगली येथे वाघाच्या हल्ल्यात मृत्यू झालेल्या कुटुंबीयांच्या दुःखाची दखल घेण्यासाठी पालकमंत्र्यांनी घटनास्थळी भेट दिली नाही, असा आरोप खासदार अमर काळे यांनी आपल्या भाषणातून केला. संबंधित कुटुंब दुःखात असताना पालकमंत्री कार्यक्रमांमध्ये व्यस्त राहिले, इतर प्रशासनाकरवी अंत्यविधीकरिता कुटुंबावर व गावकऱ्यावर दबाव टाकला जात होता, अशी टीका त्यांनी केली.

२०२९ च्या निवडणुकीत मोदी-शहा १५० जागांच्या वर जाणार नाहीत- विश्वंभर चौधरी



आर्वी :- देशाच्या राजकारणाची सध्याची परिस्थिती लक्षात घेता मोदी शहा २०२९ ला १५० च्या वर जाणार नाही.

असे प्रतिपादन ज्येष्ठ विचारवंत व लेखक डॉ. विश्वंभर चौधरी यांनी आर्वी येथे आयोजित गांधी जयंती निमित्त व्याख्यानात केले. आर्वी येथे गांधी जयंतीच्या पर्वावर भारतीय राष्ट्रीय काँग्रेस व प्रहार सोशल फोरम यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित जाहीर व्याख्यानात प्रमुख वक्ते म्हणून ते बोलत होते. यावेळी मंचावर कार्यक्रमाचे अध्यक्ष खासदार अमरभाऊ काळे , प्रमुख अतिथी म्हणून धामणगाव रेल्वे मतदार संघाचे माजी आमदार श्री. विरेंद्रभाऊ जगताप , प्रहार सोशल फोरम चे संस्थापक अध्यक्ष बाळाभाऊ जगताप , माजी जिल्हा परिषद अध्यक्ष कलावतीताई वाकोडकर, नगरसेवक व गटनेते प्रा. वाघमारे, नगरसेविका प्रियंका भिमके व मान्यवर उपस्थित होते. भारतीय राजकारणाची वर्तमान स्थिती व गांधी या विषयावर प्रमुख वक्ते विश्वंभर चौधरी यांनी आपले विचार मांडताना गांधी हे फक्त नाव नसून ते एक विचार आहे . गांधीचा विरोध करणारे सुद्धा दाखवण्यापुरते का होईना गांधीला पुजतात व गांधीचे गोडवे गातात. नथुराम गोडसे याचा देशाच्या फाळणीला विरोध होता तर गांधी ऐवजी जिन्नावर त्याची बंदूक का चालली नाही ? हा प्रश्न त्यांनी उपस्थित केला . सावरकर व जिन्ना हे समांतर विचारसरणीचे लोक होते. एकाला मुस्लिम राष्ट्र हवे होते तर एकाला हिंदू राष्ट्र आणि या दोघांचा मुख्य शत्रू म्हणजे गांधी . गांधीच्या विरोधातच यांनी पंजाब , पश्चिम बंगाल अशा ठिकाणी मुस्लिम लीग आणि हिंदू महासभा यांची राजकीय युती झालेली आपल्याला बघायला मिळते . गांधी हे सर्वसमावेशी नेते होते . म्हणून गांधी आजही विचाराच्या रूपाने जिवंत आहे . असे प्रतिपादन डॉ. विश्वंभर चौधरी यांनी केले . संविधान न मानणारे जातीवादी , धर्मवादी सरकार जाणे ही काळाची गरज आहे . आताच्या राजकीय परिस्थितीनुसार ही सरकार आपला कार्यकाळ पूर्ण करेल की नाही ही शंका आहे. २०२९ लाहे मोदी शहा चे सरकार १५० जागांच्या वर जाणार नाही असे भाकीत सुद्धा चौधरी यांनी व्यक्त केले.

कार्यक्रमाचे प्रास्ताविक आयोजक काँग्रेस नेते तथा प्रहार सोशल फोरम चे संस्थापक अध्यक्ष बाळाभाऊ जगताप यांनी केले . तर संचालन अभिजित राऊत व ताराचंद नेहारे यांनी केले. व आभार प्रदर्शन नगरसेविका प्रियंका भिमके यांनी केले.

कार्यक्रमाला मोठ्या प्रमाणात कार्यकर्ते , नागरिक व श्रोत्यांची उपस्थिती होती. कार्यक्रमाच्या यशस्वितेकरिता विक्रम भगत, सोहेल खान, संजय कुरिल, जुनेद भाई, समीर दिलकश, प्रफुल कुंभोद, संदीप लोखंडे, वेदांत वानखेडे, देवा भलावी , गुड्डू पठाण, फारुख भाई, धीरज गिरडे, संदीप राठोड यांच्याचे असंख्य कार्यकर्त्यांनी परिश्रम घेतले.

आर्वीत वाहतूक नियम तोडणाऱ्यांना दणका

आर्वी : जिल्ह्यात राबविण्यात येत असलेल्या जीवन सुरक्षा अभियानांतर्गत आर्वी शहरात वाहतूक नियमांचे उल्लंघन करणाऱ्या वाहनचालकांविरुद्ध पोलिसांनी धडक कारवाई काल दिनांक २ ऑक्टोबरला केली. वाहतूक नियंत्रण शाखा वर्धा आणि आर्वी पोलिसांच्या संयुक्त कारवाईत २३७ वाहनांवर चलानाची कारवाई करण्यात आली असून, ३ लाख ४५ हजार ५०० रुपयांचा दंड ठोठावण्यात आला.

पोलीस अधीक्षक सौरभ कुमार अग्रवाल व अपर पोलीस अधीक्षक सदाशिव वाघमारे यांच्या मार्गदर्शनाखाली ही मोहीम राबविण्यात आली. आर्वी शहरातील वाहतूक व्यवस्था सुरळीत राहावी, अपघातांना आळा बसावा तसेच नागरिकांच्या जीवितावी सुरक्षितता सुनिश्चित व्हावी, या उद्देशाने विविध ठिकाणी वाहनांची तपासणी करण्यात आली.

या कारवाईदरम्यान रस्त्यावर वाहने उभी करणे, अनधिकृत पार्किंग, विनानंबर प्लेट वाहने, ट्रिपल सीट प्रवास, कर्णकर्कश आवाजाचे सायलेंसर व प्रेशर हॉर्नचा वापर यासह वाहतूक नियमांचे उल्लंघन करणाऱ्या वाहनचालकांवर कारवाई करण्यात आली. अल्पवयीन मुलांना वाहन चालविण्यास देऊ नये, दुचाकीस्वारांनी हेल्मेटचा वापर करावा, चारचाकी वाहनचालकांनी सीटबेल्टचा वापर करावा तसेच वाहतूक नियमांचे काटेकोरपणे पालन करावे, असे आवाहन पोलिसांकडून करण्यात आले आहे.ही कारवाई ठाणेदार सतीश डेहणकर त्यांच्या नेतृत्वात स.फौ अनिल तिवारी, स.फौ शेडमाके, स.फौ. डोळे, पो.हवा रोशनी, पो.शि कोमल, पो.शि प्रमोदीनी, वाहतूक नियंत्रण शाखा वर्धा तसेच पो.शि. प्रदीप खंडाळे, पोलीस स्टेशन आर्वी यांनी केली.

संपादकीय

अर्थव्यवस्थेची दिलासादायक झेप



भारतीय अर्थव्यवस्थेच्या विकास दरावर गेल्या काही वर्षांमध्ये सातत्याने प्रश्न उपस्थित झाले. कोरोना महामारीनंतरची अनिश्चितता, महागाई, व्याजदर, कच्चा तेलाच्या किमती, रशिया-युक्रेन युद्ध, पश्चिम आशियातील संघर्ष, जागतिक पुरवठा साखळीतील व्यत्यय आणि व्यापार युद्धाचे सावट या सर्वांचा परिणाम भारतावर होणे स्वाभाविक होते. तरीही भारताने अनेक मोठ्या अर्थव्यवस्थांच्या तुलनेत आपली वाढ कायम टेवली. आंतरराष्ट्रीय नाणेनिधीचे उपव्यवस्थापकीय संचालक निगेल क्लार्क यांनी सप्टेंबरमध्ये भारताला 'जगातील सर्वाधिक वेगाने वाढणारी प्रमुख अर्थव्यवस्था' म्हणत मजबूत मूलभूत घटक आणि धोरणात्मक चौकटींचा उल्लेख केला. ही बाब महत्त्वाची आहे. कारण अर्थव्यवस्थेची खरी ताकद केवळ एका तिमाहीच्या जीडीपीमध्ये दिसत नाही. बाह्य धक्के सहन करण्याची क्षमता, बँकिंग क्षेत्राची स्थिती, सरकारी वित्तव्यवस्था, परकीय चलनसाठा, देशांतर्गत बाजारपेठ आणि गुंतवणुकीची क्षमता यांचा एकत्रित परिणाम आर्थिक लवचीकतेवर होत असतो. जागतिक बँकेनेही भारताच्या मजबूत व्यापक आर्थिक पायाभूत स्थितीचा उल्लेख करताना मोठा परकीय चलनसाठा, तुलनेने कमी महागाई, ग्रामीण भागाने रुपयातील सार्वजनिक कर्ज आणि आरोग्यदायी वित्तीय क्षेत्र यांना बाह्य धक्क्यांपासून संरक्षण देणारे घटक म्हटले आहे. मोदी सरकारच्या आर्थिक धोरणांकडे पाहताना सर्वप्रथम सार्वजनिक भांडवली खर्चाचा विचार करावा लागतो.

अलिकडच्या काळात महामार्ग, रेल्वे, बंदरे, विमानतळे, लॉजिस्टिक्स, डिजिटल पायाभूत सुविधा आणि ऊर्जा क्षेत्रातील गुंतवणुकीने अर्थव्यवस्थेत मागणी निर्माण करण्याचे काम केले. सरकारने सार्वजनिक गुंतवणुकीला विकासाचे प्रमुख साधन बनवले. खाजगी गुंतवणुकीचा वेग सर्वच काळ अपेक्षेइतका राहिला नसला, तरी सरकारी भांडवली खर्चाने बांधकाम, पोलाद, सिमेंट, वाहतूक, अभियांत्रिकी आणि संबंधित सेवा क्षेत्रांना मागणी दिली. याचबरोबर वस्तू आणि सेवा कर अर्थात जीएसटीने देशांतर्गत बाजारपेठेचे एकत्रीकरण केले. सुरुवातीच्या अडचणी आणि तांत्रिक प्रश्न असूनही करप्रणाली अधिक औपचारिक करण्याच्या प्रक्रियेला त्यातून चालना मिळाली. डिजिटल व्यवहारांच्या वाढीनेही अर्थव्यवस्थेच्या औपचारीकरणाला वेग दिला. आधार, 'यूपीआय' आणि थेट लाभ हस्तांतरण यांसारख्या डिजिटल सार्वजनिक पायाभूत सुविधांनी व्यवहारांचा खर्च कमी करण्यास आणि सरकारी मदत थेट लाभार्थीपर्यंत पोहोचवण्यास हातभार लावला. आंतरराष्ट्रीय नाणेनिधीच्या अलिकडील विश्लेषणातही भारताच्या डिजिटल सार्वजनिक पायाभूत सुविधांना आणि वित्तीय क्षेत्रातील सुधारणांना आर्थिक प्रगतीच्या महत्त्वाच्या घटकांमध्ये स्थान देण्यात आले आहे. बँकिंग क्षेत्रातील बदल हा आणखी एक महत्त्वाचा घटक आहे. मागील दशकातील 'दिवन बॅलन्स शीट' समस्या म्हणजे बँकांची वंकित कर्जे आणि कंपन्यांवरील मोठा कर्जभार हळूहळू कमी झाला. बँकांच्या अनुत्पादक कर्जाचे प्रमाण मोठ्या प्रमाणात खाली आले आणि कॉर्पोरेट क्षेत्राची आर्थिक स्थिती सुधारली. याचा फायदा पुढील गुंतवणुकीसाठी उपलब्ध कर्जपुरवाहाला झाला. मजबूत बँकिंग व्यवस्था आर्थिक संकटाच्या काळात अर्थव्यवस्थेला धक्का शोषून घेण्याची क्षमता देते.

भारताच्या वाढीमागे केवळ सरकारी खर्च नाही. देशांतर्गत उपभोग हा भारतीय अर्थव्यवस्थेचा सर्वात मोठा आधार आहे. भारताची विशाल लोकसंख्या ही केवळ लोकसंख्येची आकडेवारी नाही, तर जगातील मोठ्या ग्राहक बाजारपेठांपैकी एक आहे. अमेरिका, युरोप किंवा चीनसारख्या वाढ्या बाजारपेठांवर पूर्णपणे अवलंबून न राहता भारताला आपल्या देशांतर्गत मागणीचा आधार मिळतो. जागतिक व्यापारात अनिश्चितता वाढली की, हा आधार आर्थिक महत्त्वाचा ठरतो. याच कारणामुळे भारतावर जागतिक मंदीचा परिणाम होतो; पण तो काही इतर निर्यातप्रधान अर्थव्यवस्थांइतका तीव्र असणे आवश्यक नाही. सेवाक्षेत्र हा त्याचा आणखी एक मजबूत आधार आहे. माहिती-तंत्रज्ञान, व्यवसाय प्रक्रिया, वित्तीय सेवा, ग्लोबल कॅपेबिलिटी सेंटर्स आणि व्यावसायिक सेवांच्या निर्यातीमुळे भारताला परकीय चलन मिळते. जागतिक तंत्रज्ञान उद्योगात कृत्रिम बुद्धिमत्तेच्या गुंतवणुकीची लाट आली असतानाही भारतीय तंत्रज्ञान आणि सेवा कंपन्यांना त्याचा फायदा होण्याची शक्यता आहे. आशियाई विकास बँकेचा सप्टेंबर २०२६ चा अंदाज याच दिशेने संकेत देतो. 'एडीबी'ने भारताची वित्त वर्ष २०२६ ची वाढ सात टक्के राहण्याचा अंदाज व्यक्त केला असून त्यामागे मजबूत उपभोग, निरोगी गुंतवणूक आणि सेवा निर्यातीचा उल्लेख केला आहे. अधिक महत्त्वाचे म्हणजे, या अंदाजात उच्च ऊर्जा किमती आणि कमकुवत मान्सूनसारख्या जोखमींचाही उल्लेख आहे. म्हणजेच भारताच्या वाढीची क्षमता मान्य करताना आंतरराष्ट्रीय संस्था अडचणींकडेही दुर्लक्ष करत नाहीत.

२०२६-२७ या आर्थिक वर्षाच्या पहिल्या तिमाहीतील ७.८ टक्के वास्तविक जीडीपी वाढ हा देखील महत्त्वाचा संकेत आहे. अधिकृत आकडेवारीनुसार या तिमाहीमध्ये वास्तविक जीडीपी ८१.३६ लाख कोटी रुपये होता, तर मागील वर्षाच्या याचतिमाहीमध्ये तो ७५.४६ लाख कोटी रुपये होता. मागील वर्षाच्या पहिल्या तिमाहीतील ६.९ टक्के वाढीपेक्षा ही गती अधिक आहे; मात्र याच टिकाणी आर्थिक चर्चेतील राजकीय ध्रुवीकरण टाळणे आवश्यक आहे. जीडीपीवाढ झाली म्हणजे अर्थव्यवस्थेतील प्रत्येक घटक सुखी आहे, असे होत नाही. त्याचप्रमाणे सरकारच्या धोरणांचा काहीही परिणाम नाही, असे म्हणणेही आकडेवारीशी सुसंगत ठरणार नाही. सार्वजनिक गुंतवणूक, करसुधारणा, डिजिटल पायाभूत सुविधा, बँकिंग सुधारणा आणि उत्पादनाला चालना देणाऱ्या धोरणांनी आर्थिक क्षमतेवर परिणाम केला आहे; पण या परिणामाचे प्रमाण मोजताना जागतिक परिस्थिती, खाजगी क्षेत्राचे निर्णय, रिझर्व्ह बँकेचे धोरण आणि आंतरराष्ट्रीय बाजारातील घडामोडी यांचाही विचार करावा लागतो. भारतासमोरील सर्वात मोठे आव्हान आता 'वाढ किती?' यापेक्षा 'वाढ किती आणि कोण टिकाऊ?' हे आहे. जीडीपीवाढीचा फायदा रोजगार निर्मितीत पुरेशा प्रमाणात झाला पाहिजे. तरुण लोकसंख्येला गुणवत्तापूर्ण रोजगार मिळाला नाही, तर वेगवान आर्थिक वाढीचे सामाजिक लाभ मर्यादित राहू शकतात. उत्पादकता वाढविणे, कौशल्य विकास, महिला कामगार सहभाग वाढवणे, लघु आणि मध्यम उद्योगांना भांडवल उपलब्ध करून देणे आणि खाजगी गुंतवणुकीला अधिक वेग देणे ही पुढची मोठी आव्हाने आहेत.

प्राणी कल्याण व प्राणी संरक्षण हेतू ?



दरवर्षी ४ ऑक्टोबरला जागतिक प्राणी दिन जगभरात प्राण्यांचे कल्याण, संरक्षण आणि त्यांच्या हक्कांबद्दल जनजागृती करण्यासाठी साजरा केला जातो.

इतिहास आणि सुरुवात: ? पहिली सुरुवात: जर्मन लेखक व प्रकाशक ''हेनरिक झिमरमन'' यांनी दि.२४ मार्च १९२५ रोजी बर्लिन येथे पहिला प्राणी दिन आयोजित केला होता. ? दि.४ ऑक्टोबर तारीख: पुढे सन १९३१ मध्ये इटलीच्या फ्लोरेन्स शहरात झालेल्या आंतरराष्ट्रीय पर्यावरण परिषदेत हा दिवस दरवर्षी ४ ऑक्टोबर रोजी साजरा करण्याचा ठराव संमत झाला.

उद्दिष्ट व महत्त्व: ड१. क्रूरता थांबवणे: प्राण्यांवर होणारे अत्याचार, छळ आणि हिंसाचार थांबवणे. ड२. संवेदनशीलता: लोकांमध्ये मुक्या प्राण्यांविषयी प्रेम, दया आणि आपुलकीची भावना निर्माण करणे. ड३. अस्तित्व रक्षण: जंगलतोड, प्रदूषण आणि मानवी हस्तक्षेपामुळे धोक्यात असलेल्या प्राण्यांचे अस्तित्व आणि पर्यावरण वाचवणे. कसा साजरा केला जातो?: ? प्राणीमित्र संघटना विविध शिबिरे, दत्तक कार्यक्रम आणि जनजागृती रॅली आयोजित करतात. ? पाळीव आणि वन्य प्राण्यांच्या आरोग्याविषयी व त्यांच्या हक्काविषयी समाजात चर्चा घडवून आणल्या जातात. श्री कृष्णकुमार आनंदी-गोविंदा निकोडे गुरूजी सदर मार्गदर्शक संकलित लेख प्रस्तुत करताहेत जी..... संपादक..

जागतिक प्राणी दिन आज रविवार, दि.४ ऑक्टोबर रोजी महान व्यक्ति लहान, सर्वांवर प्रेम करा या थीमसह साजरा केला जात आहे. हा एक दिवस आहे ज्यामध्ये जगभरातील देश प्राण्यांच्या कल्याणासाठी आणि हक्कांसाठी काम करतात. प्राण्यांवरील क्रूरता आणि अत्याचार रोखण्यासाठी आणि प्राण्यांच्या कल्याणाची आणि अधिकारांची जाणीव करून देण्यासाठी दरवर्षी ४ ऑक्टोबरला जागतिक प्राणी कल्याण दिन आंतरराष्ट्रीय स्तरावर साजरा केला जातो .

जागतिक प्राणी दिन प्रथम दि. ४ ऑक्टोबर १९२९ रोजी साजरा करण्यात आला, त्याची सुरुवात जर्मन लेखक आणि प्रकाशक 'हेनरिक झिमरमन' यांनी प्राणी कल्याणाविषयी जागरूकता वाढवण्यासाठी केली. दि.२४ मार्च १९२५ रोजी जागतिक प्राणी दिनाचे आयोजन हेनरिक झिमरमन(१८८७-१९४२)नावाच्या जर्मन व्यक्तीने केले होते. ते केवळ लेखकच नव्हते, तर त्यांनी मेन्स एण्ड हुंड (माणूस आणि कुत्रा) नावाचे द्वैमासिक देखील प्रकाशित केले, या मासिकाचा उपयोग प्राणी कल्याणाविषयीच्या त्यांच्या विचारांचा चालना देण्यासाठी एक माध्यम म्हणून केला आणि जागतिक प्राणी दिन समितीची स्थापना करण्यासाठी त्याचा वापर केला. दि. २४ मार्च १९२५ रोजी त्यांच्या समितीने जागतिक प्राणी कल्याण दिनाचे आयोजन केले होते, त्यांनी बर्लिन, जर्मनी येथील स्पोर्ट्स पॅलेस येथे त्या वेळच्या प्राणी कल्याणाच्या समस्यांबद्दल जागरूकता निर्माण करण्यासाठी त्याचे आयोजन केले आणि या पहिल्या कार्यक्रमात सुमारे ५,००० लोक उपस्थित होते. हा कार्यक्रम असिसीच्या सेंट फ्रान्सिसच्या मेजवानीच्या दिवसाशी संरेखित होता, जो ४ ऑक्टोबरच होता.

शेवटी ४ ऑक्टोबर हा जागतिक प्राणी दिवस म्हणून साजरा करण्याचा ठराव मे १९३१ मध्ये फ्लोरेन्स इटलीतील आंतरराष्ट्रीय प्राणी संरक्षण काँग्रेसने स्वीकारला. त्यानंतर आज जगभरात प्राण्यांच्या कल्याणासाठी जागतिक प्राणी दिन साजरा केला जातो. 'सर्व सृष्टीवर प्रेम करा'' हे भारतीय संस्कृतीमध्ये अनेक प्रकारे सांगितले आहे. जगद्गुरु जगद्गंथ संतशिरोमणी तुकाराम महाराज समजावितात-

'वृक्षवल्ली आम्हा सोयरी ।वनचरे ।।
पक्षीही सुस्वरे । आळविती ।।'

जगात अनेक ठिकाणी प्राणिमात्रांना क्रूरपणे वागवले जाते किंवा त्यांच्याकडे दुर्लक्ष केले जाते. वाढत्या लोक संख्येमुळे पूर्वीची घनदाट जंगले तुटून तिथे गावाची नगरे व नगरांची महानगरे होत असताना भरपूर प्रमाणात जंगल तोड झाली. त्यामुळे प्राण्यांचे अस्तित्व धोक्यात आले आहे. काही पाळीव प्राण्यांना अतिशय चांगले वागवले जाते, तर काहींना दिवसभरात खायलाही मिळत नाही. ही समस्या जगापुढे आणण्यासाठी जगभरात विविध कार्यक्रम आयोजित केले जातात. लहान-मोठ्या, पाळीव-भटक्या अशा सर्व प्राणिमात्रांचा यांमध्ये समावेश होतो.

पर्यावरणासोबतच प्राण्यांचेही संरक्षण व्हावे, यासाठी सन १९३१ मध्ये इटली देशातील फ्लोरेन्स शहरात एक पर्यावरण परिषद भरवण्यात आली होती. या परिषदेत लोकांमध्ये प्राण्यांविषयी संवेदनशीलता आणि आपुलकीची भावना जागृत व्हावी यासाठी ४ ऑक्टोबर हा दिवस ''जागतिक प्राणी दिन'' म्हणून पाळला जावा, असे ठरवण्यात आले. तेव्हापासून हा दिवस ''जागतिक प्राणी दिवस'' म्हणून ओळखला जातो. प्राण्यांवर प्रेम करणाऱ्या प्रत्येकासाठी आजचा दिवस खास आहे. आज जगभर जागतिक प्राणी दिन साजरा केला जात आहे. पाळीव प्राणी तसेच इतरही प्राण्यांवर आपल्या मुलांप्रमाणे प्रेम करणाऱ्यांची संख्या काही कमी नाही. आजचा दिवस अशा लोकांसाठी खास आणि महत्त्वाचा आहे. जगभरात दरवर्षी ४ ऑक्टोबर हा दिवस जागतिक प्राणी दिन म्हणून साजरा केला जातोय, हे योग्यच!

जागतिक प्राणी दिन सप्ताह

जागतिक प्राणी दिन दिनाचा इतिहास: असिसिचे संत फ्रान्सिस यांचं प्राण्यावर खूप प्रेम होतं. त्यांनी ४ ऑक्टोबर १९२५ या दिवशी प्राण्यासाठी ''उत्सव दिन'' म्हणजे 'फिस्ट डे' साजरा करायला सुरुवात केली. त्यानंतर सन १९३१ साली इटली येथे इंटरनॅशनल ॲनिमल प्रोटेक्शन काँग्रेस भरवण्यात आली होती. त्यामध्ये संत फ्रान्सिस यांचा सन्मान म्हणून ४ ऑक्टोबरला आंतरराष्ट्रीय प्राणी दिवस साजरा करण्यावर ठरवलं. जागतिक प्राणी दिनाचा उद्देश आणि महत्व: जागतिक प्राणी दिनाचा मूळ उद्देश हा जगभरातील प्राण्यांच्या परिस्थितीवर आवाज उठवणे आणि त्यांच्या कल्याणासाठी उपाययोजना करणे, त्याबद्दल जागरूकता निर्माण करणे हा आहे. आजच्या दिवशी जगभरातील प्राणीमित्र संघटना, प्राणी हक्क संघटना तसेच या विषयावर कार्य करणाऱ्या विविध संघटना एकत्रित येतात आणि जनजागृती निर्माण करण्याचा प्रयत्न करतात. जगभरातले सर्व प्राणी, म्हणजे पाळीव प्राणी आणि जंगलातले प्राणी, या सर्वांवर प्रेम करणाऱ्या, त्यांच्या संवर्धनासाठी प्रयत्न करणाऱ्या लोकांचाही आज सन्मान केला जातो. पशु-पक्षी, प्राणी यांच्या संरक्षणाचे जे काही कायदे आहेत, त्यांना अद्ययावत बनवण्यासाठी विविध प्राणी संघटना प्रयत्न करतात. त्यामुळे शिकारी अथवा तस्कर हे कायद्यातील पळवाट शोधून पळून जाणार नाहीत. प्राणी हे निसर्गातील अन्नसाखळीतील एक महत्त्वाचा घटक आहेत. आजही जगभरातल्या जवळपास एक अब्ज गरीब लोकांना प्राण्यांमुळे रोजगार मिळतोय. त्यामुळे शाश्वत विकासासाठी प्राण्यांची काळजी घेणे, त्यांचं संवर्धन करणे अत्यावश्यक आहे.

जागतिक प्राणी दिन, ज्याला कधीकधी जागतिक प्राणी कल्याण दिन किंवा जागतिक प्राणी संरक्षण दिन असेही म्हटले जाते, हा जगभरातील प्राण्यांचे हक्क आणि कल्याण साजरे करण्यासाठी ४ ऑक्टोबर रोजी साजरा केला जाणारा एक वार्षिक कार्यक्रम आहे. हा एक महत्त्वाचा दिवस असून सन १९२५ पासून तो साजरा केला जात आहे आणि एक वाढता आंतरराष्ट्रीय समुदाय सर्व प्राण्यांचे अनावश्यक दुःख संपवण्यासाठी प्रयत्नशील आहे. जगभरात जागरूकता वाढवून आणि शिक्षण सुधारून, या कामात सहभागी असलेले लोक वन्य आणि पाळीव प्राण्यांना विचार, भावना आणि स्वतंत्र व्यक्तिमत्व असलेले संवेदनशील जीव म्हणून मान्यता देणारी जागा निर्माण करण्यास मदत करत आहेत. त्यांच्या प्राणी कल्याणाच्या पद्धती आणि त्यांना दिली जाणारी वागणूक यातून हेच ??प्रतिबिंबित झाले पाहिजे. एका कवी महाशयांनी म्हटले आहे-

'बिनभिंतीची उघडी शाळा,
लाखो इथे गुरू ?
वृक्ष-वेली, पशु-पाखरे,
यांशी दोस्ती करू ?'

जागतिक स्तरावर पोहोच असल्यामुळे, जगभरातील अनेक लोक जागतिक प्राणी दिन वेगवेगळ्या प्रकारे साजरा करतात. व्यवसाय आणि व्यक्ती विविध मार्गांनी जागतिक प्राणी दिन साजरा करून प्राण्यांना आवाज देऊ शकतात; मग तो धर्मादाय संस्थांसाठी निधी उभारणीचा कार्यक्रम असो किंवा शैक्षणिक सत्र असो, प्रत्येकाला सहभागी होण्यासाठी अनेक पर्याय उपलब्ध आहेत. विविध समाज माध्यमांवरून सक्रिय साभार जी!

!! आंतरराष्ट्रीय प्राणी दिनाच्या सप्ताहभर सर्वांना प्रेरक हार्दिक हार्दिक शुभेच्छा जी !!

- संकलन व सुलेखन
श्री कृष्णकुमार
आनंदी-गोविंदा निकोडे गुरूजी.
(एक प्राणी प्रेमी)
राह. श्रीगुरूदेव
प्रार्थनामंदिर जवळ, रामनगर वॉर्ड,
गडचिरोली.
फक्त मधुभाष-
९६९९८३६७१७.

बनवण्यासाठी विविध प्राणी संघटना प्रयत्न करतात. त्यामुळे शिकारी अथवा तस्कर हे कायद्यातील पळवाट शोधून पळून जाणार नाहीत. प्राणी हे निसर्गातील अन्नसाखळीतील एक महत्त्वाचा घटक आहेत. आजही जगभरातल्या जवळपास एक अब्ज गरीब लोकांना प्राण्यांमुळे रोजगार मिळतोय. त्यामुळे शाश्वत विकासासाठी प्राण्यांची काळजी घेणे, त्यांचं संवर्धन करणे अत्यावश्यक आहे.

जागतिक प्राणी दिन, ज्याला कधीकधी जागतिक प्राणी कल्याण दिन किंवा जागतिक प्राणी संरक्षण दिन असेही म्हटले जाते, हा जगभरातील प्राण्यांचे हक्क आणि कल्याण साजरे करण्यासाठी ४ ऑक्टोबर रोजी साजरा केला जाणारा एक वार्षिक कार्यक्रम आहे. हा एक महत्त्वाचा दिवस असून सन १९२५ पासून तो साजरा केला जात आहे आणि एक वाढता आंतरराष्ट्रीय समुदाय सर्व प्राण्यांचे अनावश्यक दुःख संपवण्यासाठी प्रयत्नशील आहे. जगभरात जागरूकता वाढवून आणि शिक्षण सुधारून, या कामात सहभागी असलेले लोक वन्य आणि पाळीव प्राण्यांना विचार, भावना आणि स्वतंत्र व्यक्तिमत्व असलेले संवेदनशील जीव म्हणून मान्यता देणारी जागा निर्माण करण्यास मदत करत आहेत. त्यांच्या प्राणी कल्याणाच्या पद्धती आणि त्यांना दिली जाणारी वागणूक यातून हेच ??प्रतिबिंबित झाले पाहिजे. एका कवी महाशयांनी म्हटले आहे-

'बिनभिंतीची उघडी शाळा,
लाखो इथे गुरू ?
वृक्ष-वेली, पशु-पाखरे,
यांशी दोस्ती करू ?'

जागतिक स्तरावर पोहोच असल्यामुळे, जगभरातील अनेक लोक जागतिक प्राणी दिन वेगवेगळ्या प्रकारे साजरा करतात. व्यवसाय आणि व्यक्ती विविध मार्गांनी जागतिक प्राणी दिन साजरा करून प्राण्यांना आवाज देऊ शकतात; मग तो धर्मादाय संस्थांसाठी निधी उभारणीचा कार्यक्रम असो किंवा शैक्षणिक सत्र असो, प्रत्येकाला सहभागी होण्यासाठी अनेक पर्याय उपलब्ध आहेत. विविध समाज माध्यमांवरून सक्रिय साभार जी!

!! आंतरराष्ट्रीय प्राणी दिनाच्या सप्ताहभर सर्वांना प्रेरक हार्दिक हार्दिक शुभेच्छा जी !!

- संकलन व सुलेखन -
श्री कृष्णकुमार आनंदी-
गोविंदा निकोडे गुरूजी.
(एक प्राणी प्रेमी)
राह. श्रीगुरूदेव प्रार्थनामंदिर
जवळ, रामनगर वॉर्ड, गडचिरोली.
फक्त मधुभाष-
९६९९८३६७१७.

भूकबळी ..

भूक निर्देशांकात
नंबर आहे किती
रिपोर्ट मधून सारी
कळते बरे माहिती

आपण आहो कुठे
पहावे ग्राफवरती
कुपोषीत ती बाळे
आवरनाही उद्रेकांस
पाण्यात पेटवे जाळ

सत्य मार्गा चालणारे
त्यांच्यांवर उगांआळ
शुध्दस्वच्छ नदीमध्ये
भरगच्च भरला गाळ

काठी लाठी पाठीवर
करे कुणी टाळाटाळ
बेबंद धुंद झाले शब्द
सरे बोलणे वस्त्रगाळ

तराजू संशयी नजरेत
नसे कसला मेळताळ
विक्रम उत्तर देत राही
समाधानी नसे वेताळ

तोंड बांधे सुविचाराचे
अकलेचा पडेदुष्काळ
समस्या होई अति उग्र
रे प्रश्न अक्राळविक्राळ

बारीकसारीक गोष्टीत
खुस्पटेपाहे खोडसाळ
युध्द घेई वेगळे वळण
वाढलेसूर्याजी पिसाळ

- हेमंत मुसरीफ पुणे .
९७३०३०६९९६.

सोकावे काळ ..

सोडूनदेता आरोप्यां
गळ्यां विजयी माळ
संदेशजातो चुकींचा
सोकावू लागी काळ

अचानक होतो प्रौढ
प्रौढी मिळवते बाळ
आवरनाही उद्रेकांस
पाण्यात पेटवे जाळ

तिसरे सांगे आम्हां
भूकबळी इथेजाती
भुकेले झालेतकबळी
वाढी फक्त प्रजाती

भरले धान्य गोदाम
रिकामीपोटे नुसती
अन्नखाई किडेमुंगी
पीकेसगळी नासती

अन्न नासाडी चाले
एकीकडे येई भरती
अन्नाददशा चालली
दुसरी कडे रे पुरती

बुभुक्षित प्रसिध्दीला
अन्नदाना हटू धरती
जाणीव हो इतरांची
का पोट भल्यावरती

भूक आणि माणूस
जोडली अतूट नाती
बरोबर आयुष्यभर
तुटेणारं ती मरणांती

- हेमंत मुसरीफ, पुणे
९७३०३०६९९६.
सर नमस्कार

वृक्ष-वेली, पशु-पाखरे, यांशी दोस्ती करू ।

जागतिक प्राणी दिन सप्ताह.

दरवर्षी ४ ऑक्टोबर रोजी जागतिक प्राणी दिन जगभरात प्राण्यांचे कल्याण, संरक्षण आणि त्यांच्या हक्कांबद्दल जनजागृती करण्यासाठी साजरा केला जातो.

इतिहास आणि सुरुवात: ? पहिली सुरुवात: जर्मन लेखक व प्रकाशक ''हेनरिक झिमरमन'' यांनी दि.२४ मार्च १९२५ रोजी बर्लिन येथे पहिला प्राणी दिन आयोजित केला होता. ? दि.४ ऑक्टोबर तारीख: पुढे सन १९३१ मध्ये इटलीच्या फ्लोरेन्स शहरात झालेल्या आंतरराष्ट्रीय पर्यावरण परिषदेत हा दिवस दरवर्षी ४ ऑक्टोबर रोजी साजरा करण्याचा ठराव संमत झाला.उद्दिष्ट व महत्त्व: ड१. क्रूरता थांबवणे: प्राण्यांवर होणारे अत्याचार, छळ आणि हिंसाचार थांबवणे. ड२. संवेदनशीलता: लोकांमध्ये मुक्या प्राण्यांविषयी प्रेम, दया आणि आपुलकीची भावना निर्माण करणे. ड३.अस्तित्व रक्षण: जंगलतोड, प्रदूषण आणि मानवी हस्तक्षेपामुळे धोक्यात आलेले प्राण्यांचे अस्तित्व आणि पर्यावरण वाचवणे. कसा साजरा केला जातो?: ? प्राणीमित्र संघटना विविध शिबिरे, दत्तक कार्यक्रम आणि जनजागृती रॅली आयोजित करतात. ? पाळीव आणि वन्य प्राण्यांच्या आरोग्याविषयी व त्यांच्या हक्काविषयी समाजात चर्चा घडवून आणल्या जातात. श्री कृष्णकुमार आनंदी-गोविंदा निकोडे गुरूजी सदर मार्गदर्शक संकलित लेख प्रस्तुत करताहेत जी..... संपादक..

जागतिक प्राणी दिन आज रविवार, दि.४ ऑक्टोबर रोजी महान व्यक्ति लहान, सर्वांवर प्रेम करा या थीमसह साजरा केला जात आहे. हा एक दिवस आहे ज्यामध्ये जगभरातील देश प्राण्यांच्या कल्याणासाठी आणि हक्कांसाठी काम करतात. प्राण्यांवरील क्रूरता आणि अत्याचार रोखण्यासाठी आणि प्राण्यांच्या कल्याणाची आणि अधिकारांची जाणीव करून देण्यासाठी दरवर्षी ४ ऑक्टोबरला जागतिक प्राणी कल्याण दिन आंतरराष्ट्रीय स्तरावर साजरा केला जातो .

जागतिक प्राणी दिन प्रथम दि. ४ ऑक्टोबर १९२९ रोजी साजरा करण्यात आला, त्याची सुरुवात जर्मन लेखक आणि प्रकाशक 'हेनरिक झिमरमन' यांनी प्राणी कल्याणाविषयी जागरूकता वाढवण्यासाठी केली. दि.२४ मार्च १९२५ रोजी जागतिक प्राणी दिनाचे आयोजन हेनरिक झिमरमन(१८८७-१९४२)नावाच्या जर्मन व्यक्तीने केले होते. ते केवळ लेखकच नव्हते, तर त्यांनी मेन्स एण्ड हुंड (माणूस आणि कुत्रा) नावाचे द्वैमासिक देखील प्रकाशित केले, या मासिकाचा उपयोग प्राणी कल्याणाविषयीच्या त्यांच्या विचारांचा चालना देण्यासाठी एक माध्यम म्हणून केला आणि जागतिक प्राणी दिन समितीची स्थापना करण्यासाठी त्याचा वापर केला. दि. २४ मार्च १९२५ रोजी त्यांच्या समितीने जागतिक प्राणी कल्याण दिनाचे आयोजन केले होते, त्यांनी बर्लिन, जर्मनी येथील स्पोर्ट्स पॅलेस येथे त्या वेळच्या प्राणी कल्याणाच्या समस्यांबद्दल जागरूकता निर्माण करण्यासाठी त्याचे आयोजन केले आणि या पहिल्या कार्यक्रमात सुमारे ५,००० लोक उपस्थित होते. हा कार्यक्रम असिसीच्या सेंट फ्रान्सिसच्या मेजवानीच्या दिवसाशी संरेखित होता, जो ४ ऑक्टोबरचे होता. शेवटी ४ ऑक्टोबर हा जागतिक प्राणी दिवस म्हणून साजरा करण्याचा ठराव मे १९३१ मध्ये फ्लोरेन्स इटलीतील आंतरराष्ट्रीय प्राणी संरक्षण काँग्रेसने स्वीकारला. त्यानंतर आज जगभरात प्राण्यांच्या कल्याणासाठी जागतिक प्राणी दिन साजरा केला जातो. 'सर्व सृष्टीवर प्रेम करा'' हे भारतीय संस्कृतीमध्ये अनेक प्रकारे सांगितले आहे. जगद्गुरु जगद्वंद्य संतशिरोमणी तुकाराम महाराज समजावितात-

'वृक्षवल्ली आम्हा सोयरी ।वनचरे ।।
पक्षीही सुस्वरे । आळविती ।।'

जगात अनेक ठिकाणी प्राणिमात्रांना क्रूरपणे वागवले जाते किंवा त्यांच्याकडे दुर्लक्ष केले जाते. वाढत्या लोक संख्येमुळे पूर्वीची घनदाट जंगले तुटून तिथे गावाची नगरे व नगरांची महानगरे होत असताना भरपूर प्रमाणात जंगल तोड झाली. त्यामुळे प्राण्यांचे अस्तित्व धोक्यात आले आहे. काही पाळीव प्राण्यांना अतिशय चांगले वागवले जाते, तर काहींना दिवसभरात खायलाही मिळत नाही. ही समस्या जगापुढे आणण्यासाठी जगभरात विविध कार्यक्रम आयोजित केले जातात. लहान-मोठ्या, पाळीव-भटक्या अशा सर्व प्राणिमात्रांचा यांमध्ये समावेश होतो. पर्यावरणासोबतच प्राण्यांचेही संरक्षण व्हावे, यासाठी सन १९३१ मध्ये इटली देशातील फ्लोरेन्स शहरात एक पर्यावरण परिषद भरवण्यात आली होती. या परिषदेत लोकांमध्ये प्राण्यांविषयी संवेदनशीलता आणि आपुलकीची भावना जागृत व्हावी यासाठी ४ ऑक्टोबर हा दिवस ''जागतिक प्राणी दिन'' म्हणून पाळला जावा, असे ठरवण्यात आले. तेव्हापासून हा दिवस ''जागतिक प्राणी दिवस'' म्हणून ओळखला जातो. प्राण्यांवर प्रेम करणाऱ्या प्रत्येकासाठी आजचा दिवस खास आहे. आज जगभर जागतिक प्राणी दिन साजरा केला जात आहे. पाळीव प्राणी तसेच इतरही प्राण्यांवर आपल्या मुलांप्रमाणे प्रेम करणाऱ्यांची संख्या काही कमी नाही. आजचा दिवस अशा लोकांसाठी खास आणि महत्त्वाचा आहे. जगभरात दरवर्षी ४ ऑक्टोबर हा दिवस जागतिक प्राणी दिन म्हणून साजरा केला जातोय, हे योग्यच!

जागतिक प्राणी दिनाचा इतिहास: असिसिचे संत फ्रान्सिस यांचं प्राण्यावर खूप प्रेम होतं. त्यांनी ४ ऑक्टोबर १९२५ या दिवशी प्राण्यासाठी ''उत्सव दिन'' म्हणजे 'फिस्ट डे' साजरा करायला सुरुवात केली. त्यानंतर सन १९३१ साली इटली येथे इंटरनॅशनल ॲनिमल प्रोटेक्शन काँग्रेस भरवण्यात आली होती. त्यामध्ये संत फ्रान्सिस यांचा सन्मान म्हणून ४ ऑक्टोबरला आंतरराष्ट्रीय प्राणी दिवस साजरा करण्यावर ठरवलं. जागतिक प्राणी दिनाचा उद्देश आणि महत्व: जागतिक प्राणी दिनाचा मूळ उद्देश हा जगभरातील प्राण्यांच्या परिस्थितीवर आवाज उठवणे आणि त्यांच्या कल्याणासाठी उपाययोजना करणे, त्याबद्दल जागरूकता निर्माण करणे हा आहे. आजच्या दिवशी जगभरातील प्राणीमित्र संघटना, प्राणी हक्क संघटना तसेच या विषयावर कार्य करणाऱ्या विविध संघटना एकत्रित येतात आणि जनजागृती निर्माण करण्याचा प्रयत्न करतात. जगभरातले सर्व प्राणी, म्हणजे पाळीव प्राणी आणि जंगलातले प्राणी, या सर्वांवर प्रेम करणाऱ्या, त्यांच्या संवर्धनासाठी प्रयत्न करणाऱ्या लोकांचाही आज सन्मान केला जातो. पशु-पक्षी, प्राणी यांच्या संरक्षणाचे जे काही कायदे आहेत, त्यांना अद्ययावत बनवण्यासाठी विविध प्राणी संघटना प्रयत्न करतात. त्यामुळे शिकारी अथवा तस्कर हे कायद्यातील पळवाट शोधून पळून जाणार नाहीत. प्राणी हे निसर्गातील अन्नसाखळीतील एक महत्त्वाचा घटक आहेत. आजही जगभरातल्या जवळपास एक अब्ज गरीब लोकांना प्राण्यांमुळे रोजगार मिळतोय. त्यामुळे शाश्वत विकासासाठी प्राण्यांची काळजी घेणे, त्यांचं संवर्धन करणे अत्यावश्यक आहे.

जनप्रभात हे दैनिक जनप्रभात हे दैनिक पत्र मालक,प्रकाशक,मुद्रक :संपादक राहुल ज्ञानेश्वरराव गजरे यांनी रुतुजा प्रिंटर्स, नवीन आष्टा, ता. आष्टी, जि.वर्धा ४४२२०२ येथे मुद्रीत करुन साप्ताहिक जनप्रभात कार्यालय, नवीन आष्टी ता. आष्टी, जि.वर्धा ४४२२०२ येथे प्रसिध्द केले. भ्रमणध्वनी ७८७५६१३६१९(या पत्रकातील सर्व माहितीशी संपादक, मालक सहमत असतीलच असे नाही. सर्व वाद वर्धा न्यायालयांतर्गत) RNINO : MAHMAR/2022/82242

माजी गृहमंत्री दिलीपराव वळसे पाटील यांना केंदूर ग्रामस्थांचे निधीसाठी पत्र

कैलास गायकवाड/ विशेष प्रतिनिधी

केंदूर ता. शिरूर गावातील संत श्रेष्ठ कान्दुराज महाराज मंदीर देऊळवाडयासाठी संरक्षण भिंतीसाठी निधी उपलब्ध होणेचावत... ग्रामस्थांनी ग्रामपंचायत केंदूर, ता. शिरूर, जि. पुणे यांजकडून राज्याचे माजी गृहमंत्री दिलीपराव वळसे पाटील यांना मागणी पत्र सादर केले आहे

केंदूर गावची सध्याची अंदाजे लोकसंख्या १९०००च्या आसपास असून संत श्रेष्ठ कान्सुराज महाराज मंदीरात 'क' वर्ग तिर्थक्षेत्र दर्जा निघालेला असल्याने दररोज भाविक भक्तांची वर्दळ असते. तसेच या ठिकाणी आषाढी कार्तिकी एकादशी निभीत्य व मार्गीजर्थ वैश्व एकादशी, नवरात्र, रामनवमी इ. वार्षिक उतावत्स पंचक्रोशीतील भाविक भक्त दर्शनास व वारकरी संत महात्मे, महाराज मंडळी, कान्होराज महाराज यांचे समाधीच्या विविध कार्यक्रमानिमीत भेटी देत असतात. परंतु देऊळ वाड्या साठी सरंक्षण भिंत नसल्यामुळे मंदीरावर कार्यक्रम करण्यास सोय होत नाही गावातील देऊळवाडा देऊळवाडा मंदिराची संरक्षण भिंत करणे गरजेचे आहे. तरी आपल्या माध्यमातून केंदूर गावातील संतश्रेष्ठ कान्हूराज महाराज मंदीर देऊळासाठी संरक्षण भिंतीसाठी निधी उपलब्ध करून मिळावा . अशा आशयाचे विनंती पत्र दिले आहे. यावेळी जिल्हा परिषदेच्या उपाध्यक्ष विवेक दादा वळसे पाटील, पंचायत समितीच्या सदस्या अंकिता वाळुंज, पंचायत समितीचे माजी सदस्य रविभाऊ करंजखेले हजर होते. सदरचे मागणी पत्र पुणे

जिल्हा किसान मोर्चाचे अध्यक्ष समाजभूषण माऊली साकोरे यांनी राज्याचे माजी गृहमंत्री दिलीपराव वळसे पाटील यांना दिले आहे.



'भीमाशंकर' कारखान्या कडून साखरेचे वाटप सुरू



लोणी (ता. आंबेगाव) : येथे भीमाशंकर सहकारी साखर कारखान्याच्या वतीने दिवाळीनिमित्त सभासद व ऊस उत्पादकांना साखर वाटपाचा प्रारंभकरण्यात आला. या वेळी लोणी येथे भैरवनाथ सेवा सोसायटीच्या अध्यक्षा रुक्मिणी ताई वाळुंज, माझे प्राचार्य वसंतराव वाळुंज, समाज वसंत कैलासराव गायकवाड, मधुकरराव रोकडे इत्यादी ग्रामस्थ हजर होते. धामणी मध्ये सरपंच प्रतिक्षा जाधव, ग्रामपंचायत सदस्य प्रतिक जाधव, बाळशिराम जाधव, राजेंद्र जाधव, दीपक जाधव, दादाभाऊ भगत, बाळासाहेब विधाटे, रामदास विधाटे, सुहास रोडे, सुधाकर जाधव उपस्थित होते. वडगावपीर येथेही साखर वाटप करण्यात आले.भीमाशंकर साखर कारखाना प्रशासनाने गावोगावी सभासद व ऊस उत्पादकांना १०, २० व ५० किलो पॅकींगमध्ये साखर वाटपाचे नियोजन केले आहे. दिवाळीनिमित्त मिळालेल्या या साखरेमुळे सभासदांनी आनंद व्यक्त केला. परंतु अपूर्ण शेअर्स वाल्यांना यावेळी कमी साखर कमी मिळाल्यामुळे काही भागधारकांनी नाराजी व्यक्त केली.

मानव विकास अंतर्गत महेश विद्यालयातील १६ विद्यार्थ्यांना संजय भोसीकर यांच्या हस्ते सायकल वाटप



तालुका प्रतिनिधी /संतोष कांबळे

लोहा तालुक्यातील शेवडी (बा.) येथील महेश विद्यालयात मानव विकास कार्यक्रमांतर्गत बाहेरगावाहून शाळेत येणाऱ्या १६ विद्यार्थ्यांनी यांना सायकलींचे वाटप करण्यात आले. विद्यार्थ्यांना शाळेत येजा करण्यासाठी सायकली उपलब्ध झाल्याने त्यांचा वेळ व श्रम वाचण्यास मदत होणार आहे.

यावेळी कंधार तालुका काँग्रेस कमिटीचे अध्यक्ष संजय भोसीकर, यशवंत पाटील भोसीकर, विद्यालयाचे मुख्याध्यापक दिलीप पवार यांच्या उपस्थितीत विद्यार्थ्यांना सायकलींचे वाटप करण्यात आले.

कार्यक्रमास पालक किशनराव वानखेडे, गंगाधर वानखेडे, पिंटू वानखेडे, चरणसिंग गव्हाणे यांच्यासह शाळेतील शिक्षक-शिक्षिका, शिक्षकेतर कर्मचारी व विद्यार्थी उपस्थित होते.

मानव विकास कार्यक्रमाच्या माध्यमातून ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांना शैक्षणिक प्रवासात सुविधा मिळत असून,सायकल वाटपामुळे बाहेरगावाहून येणाऱ्या विद्यार्थ्यांना मोठा दिलासा मिळाला आहे. यावेळी संजय भोसीकर यांनी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करताना सायकलीचा योग्य वापर करून विद्यार्थ्यांनी शाळेत नियमित यावे व अभ्यास करून उज्वल यश संपादित करीत उच्च शिक्षण घ्यावे. आपले,आपल्या पालकाचे,शाळेचे,गावचे नाव मोठे करावे असे ते मार्गदर्शन करताना म्हणाले.

यावेळी या कार्यक्रमाचे प्रस्ताविक मुख्याध्यापक दिलीप पवार यांनी केले कार्यक्रमाचे सूत्रसंचालन व्यंकटराव लुंगारे यांनी केले, याप्रसंगी विद्यार्थ्यांसह पालक व गावातील नागरिक उपस्थित होते.

जीएमआरटी व्हर्च्युअल सायन्स डे २०२६ पुरस्कार वितरण



महंमद मुलाणी / आंबेगाव

जीएमआरटी व्हर्च्युअल सायन्स डे २०२६ यशस्वीरीत्या संपन्न झाला. या सोहळ्यास डॉ. सुनील भागवत, संचालक, ध्र्ष्टि पुणे; प्रा. विक्रम काळे; प्रा. यशवंत गुप्ता, सेंटर डायरेक्टर, ऱ्हीं-उरैंऊ; प्रा. ईश्वरचंद्र, अध्यक्ष, उरैंऊ व्हर्च्युअल सायन्स डे समिती २०२६; प्रा. दिव्या ओबेरॉय, चेअरमन, सायन्स आउटरीच, ऱ्हीं-उरैंऊ; डॉ. जे. के. सोळंकी, सायन्स कम्युनिकेटर व मोटिव्हेशनल स्पीकर; तसेच निलेश छडवेलकर, अध्यक्ष, इंडियन इन्स्टिट्यूट ऑफ नॉलेज (घ्ष्ख) या मान्यवरांची उपस्थिती व मार्गदर्शन लाभले.

जीएमआरटी व्हर्च्युअल सायन्स डे हे विद्यार्थ्यांना आणि शिक्षकांना नाविन्यपूर्ण प्रकल्पांच्या माध्यमातून विज्ञानाचा शोध घेण्यासाठी आणि वैज्ञानिक दृष्टिकोन विकसित करण्यासाठी प्रोत्साहन देणारे राष्ट्रीय तसेच आंतरराष्ट्रीय व्यासपीठ आहे.

या प्रदर्शनात ७१६ प्रकल्पांमध्ये १,५०६ सहभागींचा सहभाग होता. तसेच ३५० शाळांनी या उपक्रमात सहभाग नोंदवला. ओमान, संयुक्त अरब अमिराती (ळैं), अमेरिका आणि सिंगापूर या देशांमधून मिळालेला सहभाग ही या उपक्रमाची विशेष उल्लेखनीय बाब ठरली.

जीएमआरटी व्हर्च्युअल सायन्स डे २०२६ च्या प्रकल्पांना ७६,२४१ व्ह्यूज मिळाले, तर १४,४६७ सार्वजनिक मूल्यमापन नोंदवले गेले. त्यामुळे विद्यार्थ्यांच्या वैज्ञानिक प्रकल्पांना शाळेच्या पलीकडे व्यापक प्रेक्षकांपर्यंत पोहोचण्याची संधी मिळाली.

जीएमआरटी व्हर्च्युअल सायन्स डे २०२६ हा जिज्ञासा, सर्जनशीलता आणि वैज्ञानिक विचारांचा अविस्मरणीय सोहळा बनविण्यासाठी योगदान देणाऱ्या सर्व सहभागी, शिक्षक, शाळा, मूल्यमापनकर्ते, मान्यवर पाहुणे आणि समर्थकांचे यावेळी मनःपूर्वक आभार व्यक्त करण्यात आले.

यावेळी जीएमआरटी व्हर्च्युअल सायन्स डे २०२७ लवकरच सुरू होत असल्याची घोषणा करण्यात आली आणि विद्यार्थ्यांनी, शिक्षकांनी व शाळांनी आगामी उपक्रमात मोठ्या संख्येने सहभाग नोंदवावा, असे आवाहन करण्यात आले.

महात्मा गांधीं व लालबहादूर शास्त्री जयंतीच्या निमित्ताने लोणी मध्ये स्वच्छता अभियान



कैलास गायकवाड / विशेष प्रतिनिधी

लोणी ता.आंबेगाव येथे राष्ट्रपिता महात्मा गांधी व माजी पंतप्रधान लालबहादूर शास्त्री यांच्या जयंतीच्या निमित्ताने निमित्ताने लोणी ग्रामपंचायत येथे लोकनियुक्त सरपंचडॉ.सावळाभाऊ नाईक व ग्रामपंचायत सदस्य व कर्मचारी यांच्या वतीने अभिवादन करण्यात आले. तसेच महादेव मंदिराचा परिसर, एसटी स्टँड, बाजार तळ येथे स्वच्छता अभियान राबविण्यात आले, यावेळी लोकनियुक्त सरपंच डॉ. सावळा भाऊ नाईक, समाज भूषण कैलासराव गायकवाड उपसरपंच राजूभाऊ वाळुंज, माजी उपसरपंच स्वातीताई वाळुंज, माजी उपसरपंच राहुल आढाव, ग्रामपंचायत सदस्य प्रदीप भाऊ कोचर, करिष्मा सोनवणे, ग्राम विकास अधिकारी बोडरे भाऊसाहेब,पोलीस पाटील संदीप आढाव, अंगणवाडीच्या सेविका, ग्रामस्थ हजर होते. उपकेंद्र आरोग्य येथे आरोग्य कर्मचाऱ्यांच्या वतीने स्वच्छता अभियान म्हणत आले. एवढी आरोग्य कर्मचारी लता गारुडी व त्यांचे सहकारी हजर होते.

वानखेडे महाविद्यालयात महात्मा गांधी व लालबहादूर शास्त्री यांची जयंती संपन्न

मोहपा दिलीप येवले: -

स्थानिक बॅरि. शेषराव वानखेडे महाविद्यालयात जगाला अहिंसा, सत्य आणि सहिष्णुता यांची शिकवण देणारे राष्ट्रपिता महात्मा गांधी आणि थोर स्वातंत्र्य सेनानी भारताचे दुसरे पंतप्रधान भारतरत्न लालबहादूर शास्त्री यांच्या जयंतीनिमित्त अभिवादन व स्मरण कार्यक्रमाचे आयोजन सांस्कृतिक विभागाच्या वतीने करण्यात आले. कार्यक्रमाचे अध्यक्ष प्राचार्य डॉ. अलका थोडगे, डॉ. प्रमोद वडते, डॉ. अजित जाचक, सांस्कृतिक विभाग व मराठी विभागप्रमुख डॉ. विनोद भालेराव, डॉ. धनंजय देवते, प्रा. सचिन काळे, प्रा. अनिता गणोरकर, प्रा. सिद्धार्थ चनकापुरे, प्रा. शुभम वाघ, कल्पना देवळे, हरीश अंजनकर, रजनी अकर्ते, प्रदीप बगडे ,अरविंद डहाट, प्रकाश कोकोडे आदुने अभिवादन केले.



आंबेगावच्या पूर्व भागात दुष्काळजन्य परिस्थितीची मा.दिलीप वळसे पाटील यांच्याकडून पाहणी



गरिबांचा कैवारी शेतकऱ्यांच्या बांधावर

कैलास गायकवाड/ विशेष प्रतिनिधी

लोणी : आंबेगावच्या पूर्व भागात धामणी,पहाडदरा,शिरदाळे, लोणी,वडगावपीर मांदळे वाडी ठिकाणी पडलेल्या भयाण दुष्काळजन्य परिस्थितीची पाहणी तालुक्याचे आमदार आणि माजी मंत्री मा.दिलीपराव वळसे पाटील साहेब यांनी केली.प्रत्यक्ष बांधावर जात दुष्काळजन्य परिस्थितीत शेतकरी किती संकटात आहे हे प्रत्यक्ष अनुभवले.कारण सुरवातीला झालेला अतिपाऊस यामुळे वाटाणा,मका,मुग,उडीद या पिकांना बसलेला फटका आणि गेल्या दोन महिन्यांपासून पावसाने फिरवलेली पाठ यामुळे बटाटा आणि सोयाबीन, मुगी ही मुख्य पिके अक्षरशः पावसावाचून जळून गेलेली आज साहेबांनी प्रत्यक्ष पाहिली.हे दाखवताना तर काही शेतकऱ्यांचा अक्षरशः आपल्या भावनांचा बांध देखील फुटला वळसे पाटील यांनी शेतकऱ्याच्या खांद्यावर हात ठेवून सर्व प्रकारचे मदतीचे आश्वासन दिले. कायमस्वरूपी उपाययोजना करून ह्या या भागात मोठा प्रकल्प उभारावा अशी आग्रही मागणी या भागातील शेतकऱ्यांनी केली. एकत्र येत सलग जागा जर दिली तर आपण एखादा चांगला प्रकल्प उभारू असे देखील आश्वासन यावेळी मा. वळसे पाटील यांनी दिले.त्यामुळे या भागा ग्रामस्थांनी समाधान व्यक्त केले.यावेळी वळसे पाटील साहेबांच्या समवेत पुणे जिल्हा परिषदेचे उपाध्यक्ष मा.विवेकदादा वळसे पाटील,पंचायत समिती सदस्या कु.अंकिताताई वाळुंज,मा.पंचायत समिती सदस्य मा.रविंद्र करंजखेले,मा.अध्यक्ष ख.वि.संघ मा.अनिलशेठ वाळुंज, खरेदी विक्री संघाचे माजी अध्यक्ष भगवान वाघ, गटविकास अधिकारी वाळुंज मॅडम तसेच महसूल विभागाचे आणि कृषी विभागाचे अधिकारी प्रत्येक गावातील सरपंच, उपसरपंच ग्रामपंचायत सदस्यतसेच शेतकरी ,ग्रामस्थ मोठ्या संख्येने उपस्थित होते. वळसे पाटील यांनी महसूल व शेती विभागाच्या अधिकाऱ्यांना पिक पाणी व पंचनामे करण्याच्या आदेश दिले. पाण्याचा अंदाज पाहून पिके घेण्याचे आवाहन केले. हो पाणी जपून वापरण्याचा सल्ला दिला.

मराठी अभिजात भाषा गौरव दिनानिमित्त विद्यालयात विविध उपक्रमांचे आयोजन

मराठी भाषेचा गौरव, साहित्याची ओळख आणि दंतआरोग्याबाबत विद्यार्थ्यांचे प्रबोधन

कवठे प्रतिनिधी / धनंजय साळवे

कवठे येमाई (ता. शिरूर) : मराठी भाषेचा समृद्ध वारसा, तिचे सांस्कृतिक महत्त्व आणि साहित्यिक परंपरेची विद्यार्थ्यांना ओळख व्हावी, तसेच विद्यार्थ्यांमध्ये मराठी भाषेविषयी अभिमान आणि आवड निर्माण व्हावी, या उद्देशाने मराठी अभिजात भाषा गौरव दिनानिमित्त विद्यालयात विविध शैक्षणिक व प्रबोधनात्मक उपक्रमांचे आयोजन करण्यात आले. या कार्यक्रमात मराठी भाषेचे महत्त्व, संत साहित्य, लेखक व त्यांचे साहित्य याविषयी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करण्यात आले. तसेच विद्यार्थ्यांच्या आरोग्याच्या दृष्टीने दंतआरोग्य तपासणी शिबिराचे आयोजन करून डॉ. आकाश उचाळे व डॉ. संतोष उचाळे यांनी विद्यार्थ्यांना दातांची निगा, दंतस्वच्छता आणि दातांच्या विविध आजारांविषयी सविस्तर माहिती दिली.



कार्यक्रमाच्या प्रारंभी माननीय श्री. दाभाडे एस. एस. यांनी मराठी भाषा आणि मराठी भाषेचे महत्त्व या विषयावर विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले. मराठी भाषेला लाभलेली प्राचीन परंपरा, तिचे समृद्ध साहित्य, संत साहित्याचे योगदान आणि दैनंदिन जीवनातील मराठी भाषेचे महत्त्व याविषयी त्यांनी विद्यार्थ्यांना माहिती दिली. मराठी भाषा ही केवळ संवादाचे माध्यम नसून ती महाराष्ट्राची सांस्कृतिक ओळख, परंपरा आणि अस्मिता जपणारी भाषा आहे. त्यामुळे विद्यार्थ्यांनी मराठी भाषेचा अभिमान बाळगून तिचा वाचन, लेखन आणि व्यवहारात अधिकाधिक वापर करावा, असे आवाहन त्यांनी केले.

लांडगे, मेंढ्या आणि शेतकऱ्याची युक्ती.

एका गावाच्या बाहेर एक शेतकरी मेंढ्या पाळत होता. दररोज रात्री लांडग्यांचा एक कळप त्याच्या मेंढवाड्याजवळ येत असे. मेंढ्यांवर हल्ला करण्यासाठी ते आत शिरण्याची संधी शोधत असत. शेतकरी चिंतेत पडला. त्याला माहीत होते की, यावर लवकर उपाय केला नाही तर एखाद्या रात्री लांडगे मेंढवाड्यात शिरतील आणि त्याचे संपूर्ण कळप उद्ध्वस्त करतील. म्हणून त्याने लांडग्यांशी लढण्याऐवजी त्यांना वेगळ्या पद्धतीने हरवण्याचा निर्णय घेतला.

एका संध्याकाळी त्याने भरपूर मांस विकत घेतले आणि ते मेंढवाड्याच्या प्रवेशद्वाराजवळ ठेवले. रात्री लांडगे आले. ते मेंढ्यांवर हल्ला करण्यासाठी तयार होते; पण त्यांना मेंढ्या दिसल्या नाहीत. त्याऐवजी त्यांच्यासमोर मांसाचा मोठा ढीग होता. लांडगे सावध झाले. 'ही काहीतरी युक्ती असावी,' असे त्यांना वाटले. पण ते भुकेले होते. शेवटी त्यांनी मांस खाल्ले आणि निघून गेले. दुसऱ्या दिवशी शेतकऱ्याने पुन्हा त्याच ठिकाणी मांस ठेवले. लांडगे आले. पुन्हा त्यांनी मांस खाल्ले. असेच तिसऱ्या दिवशी झालेष्ठ चौथ्या दिवशी झालेष्ठ आणि पुढेही अनेक दिवस झाले. हळूहळू लांडग्यांच्या विचार करण्याच्या पद्धतीत बदल झाला. त्यांना वाटू लागले - 'जेवण इथेच तयार मिळत असेल, तर शिकार करण्यासाठी एवढी मेहनत का करायची?' त्यामुळे त्यांनी मेंढवाड्यात शिरण्याचा प्रयत्न करणे बंद केले. हरिणांचा पाठलाग करणे बंद केले. इतर प्राण्यांची शिकार करणे बंद केले. आणि शेवटी जंगलात अन्न शोधणेही बंद केले. आता दररोज संध्याकाळी ते शेतकऱ्याच्या मेंढवाड्याजवळ येत, त्याने ठेवलेले मांस खात आणि निघून जात. दिवस गेले. आठवडे गेले. महिने गेले. आता लांडग्यांना या आरामाची सवय झाली. नंतर ते आळशी झाले. त्यांचे वजन वाढले. शरीर जड झाले. स्नायू कमकुवत झाले. पूर्वीसारखे वेगाने धावण्याची त्यांची क्षमता कमी झाली. सर्वात महत्त्वाचे म्हणजे - ते शिकार करणे विसरले. त्यांनी स्वतःच्या जगण्याची कौशल्ये गमावली होती. आता ते पूर्णपणे शेतकऱ्याने दिलेल्या अन्नावर अवलंबून झाले होते. आणि मग हिवाळा आला... हवामान अत्यंत थंड झाले. आणि अचानक एका दिवशी शेतकऱ्याने लांडग्यांसाठी मांस ठेवणे बंद केले. लांडगे त्या संध्याकाळी आले. पण तिथे काहीच नव्हते. ते वाट पाहत राहिले. तरीही काहीच मिळाले नाही. दुसऱ्या दिवशी ते पुन्हा आले. पुन्हा काहीच नव्हते. भुकेने त्यांना त्रास होऊ लागला. शेवटी त्यांनी पुन्हा शिकार करण्याचा निर्णय घेतला. पण आता एक मोठी अडचण होती - ते पूर्वीसारखे शिकारी राहिले नव्हते. ते खूप जड झाले होते. त्यांची ताकद कमी झाली होती. त्यांचा वेग कमी झाला होता. त्यांना शिकार करण्याची कौशल्ये विसरली होती. पूर्वी सहज पकडता येणारे छोटे प्राणीही आता त्यांच्या हातातून निसटत होते. लांडग्यांनी पुन्हा पुन्हा प्रयत्न केले. पण त्यांना यश आले नाही. दिवसेंदिवस ते अधिक कमजोर आणि कृश होत गेले. अन्न नव्हते आणि स्वतः अन्न मिळवण्याची क्षमता त्यांनी गमावली होती. शेवटी तो कळपच नाहीसा झाला.

शेतकऱ्याने लांडग्यांना कसे हरवले? शेतकऱ्याने त्यांच्याशी युद्ध केले नाही. त्याने त्यांचा पाठलाग केला नाही. त्यांच्यावर हल्ला केला नाही. त्याने फक्त त्यांना जे हवे होते ते इतके सहजपणे दिले की, त्यांनी स्वतःच्या जगण्याची क्षमता गमावली. आणि अशा प्रकारे त्याने आपल्या मेंढ्यांचे रक्षण केले.

कथेचा बोध हे सांगते की, अतिसोयीची सवय माणसाची क्षमता कमकुवत करू शकते. आज सहज मिळणारी गोष्ट आपल्याला आनंद देऊ शकते; पण जर त्या सोयीमुळे आपण विचार करणे, मेहनत करणे, कौशल्य विकसित करणे आणि स्वतःच्या पायावर उभे राहणे विसरलो, तर भविष्यात तीच सोय आपली कमजोरी बनू शकते. मदत करणे चांगले आहे; पण अशी मदत जी व्यक्तीची स्वावलंबनाची क्षमता नष्ट करते, ती दीर्घकाळासाठी उपयुक्त ठरेलच असे नाही. एक वेळचे मोफत अन्न आजची भूक भागवू शकते; पण स्वतः अन्न मिळवण्याची क्षमता गमावली, तर उद्याची भूक अधिक कठीण ठरू शकते.

समाजात परस्पर सहकार्य आणि गरजू व्यक्तीला मदत करणे महत्त्वाचे आहे. मात्र मदतीसोबत सक्षमीकरणही आवश्यक आहे. व्यक्तीला कायमस्वरूपी अवलंबून ठेवण्याऐवजी तिला शिक्षण, कौशल्य, संधी आणि स्वतःच्या पायावर उभे राहण्याची क्षमता देणे हे मानवी प्रतिष्ठा, समता, स्वातंत्र्य आणि बंधुता या संवैधानिक मूल्यांना बळकटी देते. खरी मदत अशी असावी जी हात धरून उभी करते; कायम हात धरून चालवत ठेवत नाही.

या कथेतून लक्षात ठेवण्यासारखे म्हणजे 'सोय आपल्याला विश्रांती देऊ शकते; पण स्वावलंबन आपल्याला सामर्थ्य देते.' 'मदत घ्या, मदत द्या; पण स्वतःच्या क्षमतेला कधीही झोपू देऊ नका.'

या कथेतून लांडग्यांच्या कोणत्या जीवनमूल्यांच्या अंगाचा ऱ्हास झाला असेल तर ते म्हणजे (०१) स्वावलंबन (०२) आत्मनिर्भरता (०३) कष्टाची प्रतिष्ठा (०४) शिस्त (०५) कौशल्यविकास (०६) जबाबदारी (०७) आत्मविश्वास (०८) दूरदृष्टी(स्वतंत्र विचार करण्याची क्षमता) (०९) आत्मपरिक्षण (१०) स्वः नेतृत्वगुण (११) सक्षमीकरण आदी.

लांडग्यांची कथा केवळ जंगलातील एका कळपाची गोष्ट नाही. तर ती आपल्या मानवी जीवनातील एका महत्त्वाच्या 'सत्याकडे' लक्ष वेधणारी आहे.

२४ तासांत घरातील चोरीचा छडा !

देवळी पोलिसांची तत्पर कारवाई; ३५ हजारांचे मंगळसूत्र केले जप्त



योगेश कांबळे

देवळी (प्रतिनिधी) : सिरसगाव (धनाडे) येथे घरातील ड्रॉवरमधून चोरीला गेलेल्या सुमारे ३५ हजार रुपये किमतीच्या मंगळसूत्राचा देवळी पोलिसांनी अवघ्या २४ तासांत छडा लावत गुन्हा उघडकीस आणला. तक्रारदाराच्या घरी नेहमी ये-जा करणाऱ्या महिलेची पोलिसांनी चौकशी केली असता तिने चोरी केल्याची कबुली दिली. तिच्याकडून चोरीस गेलेले मंगळसूत्र पोलिसांनी जप्त केले.

सिरसगाव (धनाडे) येथील हर्षल प्रभाकरराव राऊत (वय ३७) यांनी देवळी पोलीस ठाण्यात तक्रार दाखल केली होती. त्यांच्या आई सुरेखा राऊत यांचे मंगळसूत्र घरातील कॉम्प्युटर टेबलच्या ड्रॉवरमध्ये ठेवण्यात आले होते. मात्र, काही वेळाने ड्रॉवर तपासला असता मंगळसूत्र गायब असल्याचे निदर्शनास आले. अज्ञात व्यक्तीने घरात प्रवेश करून मंगळसूत्र चोरून नेल्याची तक्रार पोलिसांत करण्यात आली.

तक्रारीवरून देवळी पोलिसांनी गुन्हा दाखल करून आरोपीचा शोध सुरू केला. पोलिसांनी विविध दिशांनी तपासाची चक्रे फिरवली. तपासादरम्यान तक्रारदाराच्या घरी नियमित ये-जा करणाऱ्या एका महिलेबाबत पोलिसांना महत्त्वाची माहिती मिळाली. त्यानंतर पोलिसांनी संबंधित महिलेला विश्वासात घेऊन चौकशी केली.

चौकशीदरम्यान तिनेच मंगळसूत्र चोरी केल्याची कबुली दिली. पोलिसांनी तिच्याकडून चोरीस गेलेले सुमारे ३५ हजार रुपये किमतीचे मंगळसूत्र हस्तगत केले. त्यामुळे चोरीच्या गुन्ह्याचा अवघ्या २४ तासांत उलगडा करण्यात देवळी पोलिसांना यश आले.

ही कारवाई पोलीस अधीक्षक सौरभकुमार अग्रवाल, अपर पोलीस अधीक्षक सदाशिव वाघमारे आणि सहायक पोलीस अधीक्षक डॉ. वंदना कारखेले यांच्या मार्गदर्शनाखाली देवळी पोलीस ठाण्याचे ठाणेदार सहाय्यक पोलीस निरीक्षक संदीप कापडे यांच्या नेतृत्वात करण्यात आली. कारवाईत पोलीस हवालदार अमोल आलवाडकर, पोलीस हवालदार श्याम गावनेर, पोलीस शिपाई संतोष गिते आणि पोलीस शिपाई आकाश कसर यांनी सहभाग घेतला. गुन्ह्याचा पुढील तपास पोलीस हवालदार अमोल आलवाडकर करीत आहेत.

महापौर निता ठाकरे अखिल भारतीय महापौर परिषदेच्या ११८ व्या कार्यकारिणी बैठकीत होणार

महाराष्ट्र महापौर परिषदेच्या उपाध्यक्ष म्हणून नागपूरचे प्रतिनिधित्व करणार



नागपूर/ दिलीप वेवले

नागपूर महानगरपालिकेच्या महापौर श्रीमती निता ठाकरे या अखिल भारतीय महापौर परिषदेच्या कार्यकारिणीच्या ११८ व्या बैठकीत सहभागी होणार आहेत. महाराष्ट्र महापौर परिषदेच्या उपाध्यक्ष म्हणून त्या या बैठकीला उपस्थित राहून महाराष्ट्रातील स्थानिक स्वराज्य संस्थांचे प्रतिनिधित्व करणार आहेत.

अखिल भारतीय महापौर परिषदेच्या कार्यकारिणीची ११८ वी बैठक सोमवार ५ व ६ ऑक्टोबर रोजी चंदीगड येथे आयोजित करण्यात आली आहे. चंदीगड महानगरपालिकेचे महापौर श्री. सौरभ जोशी यांच्या सौजन्याने या बैठकीचे आयोजन करण्यात आले आहे. देशातील विविध महानगरपालिकांचे महापौर आणि परिषदेचे पदाधिकारी या बैठकीत सहभागी होणार आहेत.

महाराष्ट्र महापौर परिषदेच्या उपाध्यक्ष म्हणून महापौर श्रीमती निता ठाकरे यांचा या बैठकीतील सहभाग महत्त्वपूर्ण आहे. या सहभागाच्या माध्यमातून नागपूर शहराच्या नागरी विकासाचा अनुभव तसेच महानगरपालिकेच्या विविध उपक्रमांना राष्ट्रीय स्तरावरील व्यासपीठावर मांडण्याची संधी उपलब्ध होणार आहे.

'महात्मा गांधी यांचे केवळ स्वातंत्र्यातच नव्हे तर सामाजिक कार्यातही बहुमोल कार्य होते - डॉ.प्रमोद वाटकर'



कोरांडी /दिलीप वेवले: -

तायवाडे महाविद्यालय,महादुला - कोरांडी येथे जयंती -पुण्यतिथी समिती अंतर्गत 'महात्मागांधी आणि लाल बहादूर शास्त्री जयंती निमित्त व्याख्यान' आयोजित करण्यात आले. याप्रसंगी अध्यक्षस्थानी महाविद्यालयाचे आयक्यूएसी समन्वयक डॉ. गिरीश काटकर, प्रमुख वक्ता गांधीवादी विचार विभागाचे विभाग प्रमुख डॉ. प्रमोद वाटकर व जयंती पुण्यतिथी समितीच्या समन्वयक डॉ. थोरात व्यासपीठावर उपस्थित होते. यावेळी डॉ. प्रमोद वाटकर यांनी महात्मा गांधी यांचा केवळ स्वातंत्र्यातच नव्हे तर सामाजिक कार्यातही खूप हातभार होता, त्यांनी महात्मा गांधी यांच्या जीवनावर प्रकाश टाकून त्यांच्या छोट्या छोट्या कार्यातून प्रेरणा घेऊन केवळ भारतातीलच नव्हे तर भारताबाहेरीलही मोठमोठे व्यक्तिमत्व कसे घडले हे आपल्या मार्गदर्शनातून स्पष्ट केले.सोबतच लाल बहादूर शास्त्री यांच्या हरित क्रांती आणि श्वेत क्रांती या कार्यावर प्रकाश टाकत त्यांच्या शेतकऱ्यांविषयीच्या कार्यावरही माहिती दिली.

कार्यक्रमाचे प्रास्ताविक व अतिथींचा परिचय डॉ.प्रेरणा थोरात यांनी केले.या कार्यक्रमाचे सूत्रसंचालन वाणिज्य विभागाचे विभाग प्रमुख डॉ.विनोद खापणे यांनी केले.तर उपस्थितांचे आभार प्राणीशास्त्र विभागाचे विभाग प्रमुख डॉ.रविंद्र बाहेकर यांनी मानले. याप्रसंगी मराठी विभाग प्रमुख डॉ.राजेंद्र वाटाणे, डॉ.डवरे, डॉ.वर्षा वैद्य, डॉ. सुनीलचुगल, डॉ. आनंद भाईक , डॉ. वकील शेख, डॉ . मारोती वाघ, डॉ.राहूल वाघमारे, तसेच अन्य प्राध्यापक व विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

'स्पर्धा परीक्षेत इतिहास विभागाचे महत्व या विषयावर पाच दिवसिय मार्गदर्शन शिबीराचे आयोजन'



कोरडी /दिलीप वेवले: -

तायवाडे महाविद्यालय,महादुला - कोरडी येथे तायवाडे महाविद्यालय स्पर्धा परीक्षा समिती , इतिहास विभाग तसेच फिनिक्स करिअर अकॅडमी कोरडी यांच्या सहयोगाने पाच दिवसीय 'स्पर्धा परीक्षेत इतिहास विभागाचे महत्व' यावर कार्यशाळेचे आयोजन करण्यात आले. या कार्यशाळेला सचिन शिंदे स्पर्धा परीक्षा मार्गदर्शक व स्पर्धा परीक्षा पुस्तक लेखक मार्गदर्शन करणार आहे. या उद्घाटन कार्यक्रमाला अध्यक्ष म्हणून डॉ.वर्षा वैद्य ईजी विभाग प्रमुख तायवाडे महाविद्यालय कोरडी या होत्या तर आयोजक म्हणून इतिहास विभागप्रमुख डॉ.शरद डबरे. तसेच महाविद्यालयाचे माजी विद्यार्थी प्रदीप कमाले फिनिक्स करिअर अकॅडमी संचालक कोरडी हे उपस्थित होते . यावेळेस जवळपास ३०० विद्यार्थी या कार्यक्रमाला उपस्थित असून. स्पर्धा परीक्षा यशस्वी होण्यासाठी इतिहास विषय हा पूर्णपणे समजून घ्यावा म्हणून या परिषदेचे आयोजन करण्यात आले.

बॅरि. वानखेडे महाविद्यालयात समाज प्रबोधनपर खंजिरी वादन कार्यक्रम व आरोग्य तपासणी शिबिर



खापरखेडा/ दिलीप वेवले

बॅरि. शेषराव वानखेडे यांच्या ११२ व्या जयंतीनिमित्त दिनांक २९.०९.२०२६ रोजी, बॅरि.शेषराव वानखेडे कला व वाणिज्य महाविद्यालय याच्या राष्ट्रीय सेवा योजना विभागाच्या वतीने खंजिरी वादक तुषार सूर्यवंशी यांचे समाज प्रबोधन पर खंजिरी कीर्तन, आयोजित करण्यात आले होते. महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. आर. जी. टाले यांचे अध्यक्षतेखाली राष्ट्रीय सेवा योजना विभागाचे कार्यक्रम अधिकारी डॉ.राजेंद्र राऊत व डॉ.प्रतिभा गडवे यांनी या कार्यक्रमाचे संयोजन केले होते. सेंट्रल अर्बन को-ऑपरेटिव्ह बँक नागपूरचे, अध्यक्ष रामराव चोपडे, व राष्ट्र संत तुकडोजी महाराज विचार प्रसारक, मंडळाचे कार्यकर्ते ज्ञानेश्वर रक्षक, वंदनाताई वनकर, व महाविद्यालयाच्या स्थानीय व्यवस्थापन समितीचे सदस्य रविंद्र चिखले यांच्या प्रमुख उपस्थितीत सदर प्रबोधन पर कार्यक्रम संपन्न झाला. या समाज प्रबोधन पर कार्यक्रमासोबत या दिवशी आरोग्य तपासणी शिबिर व रक्तदान शिबिराचे देखील आयोजन करण्यात आले होते.

राष्ट्रसंत तुकडोजी महाराजांच्या, विचाराचे खंजिरी किर्तनाच्या माध्यमातून प्रसार करणाऱ्या तुषार सूर्यवंशी यांनी खंजिरी कीर्तनातून सहज सोप्या शब्दांमध्ये समाजातील, ग्रामक चालीरीती, रुढी या व्यंगांवर कोरडे ओढले व लोकांमध्ये जागीव जागृती निर्माण करण्याचा प्रयत्न केला. राष्ट्रसंत तुकडोजी महाराजांचे विचार आजही कसे प्रासंगिक ठरतात हे खंजिरी कीर्तनातून समजावून सांगून, ते विचार लोकांपर्यंत पोहोचवण्याचा तुषार सूर्यवंशी यांनी यशस्वी प्रयत्न केला.

याप्रसंगी राष्ट्र संत तुकडोजी महाराज विचारांचे प्रसारक ज्ञानेश्वर रक्षक यांनी देखील आपल्या भाषणातून राष्ट्रसंतांची महानता व आधुनिक काळातील त्यांच्या विचारांची प्रासंगिकता यावर उदबोधन केले. महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. आर. जी.टाले यांच्या अध्यक्षीय भाषणाने कार्यक्रमाचा समारोप झाला. याच दिवशी महाविद्यालयात, राष्ट्रसंत तुकडोजी महाराज कॅन्सर हॉस्पिटल, नागपूर, यांच्या द्वारा मोफत कॅन्सर तपासणी शिबिरांचे व, लाईफ लाईन ब्लड बँक ,नागपूर द्वारा रक्तदान शिबिराचे देखील आयोजन करण्यात आले होते. सोबतच उपस्थित ग्रामस्थ व विद्यार्थ्यांसाठी स्नेह भोजनाचा कार्यक्रम आयोजित करण्यात आला होता. या संपूर्ण कार्यक्रमाचे सूत्रसंचालन, व आभार प्रदर्शन प्रा. डॉ. प्रतिभा गडवे यांनी केले. सदर कार्यक्रमाला गावातील ग्रामस्थ व महाविद्यालयीन, आणि परिसरातील शालेय विद्यार्थ्यांनी उस्फुर्त सहभाग नोंदवला. महाविद्यालयातील समस्त प्राध्यापक वृंद, डॉ. गजानन सोमकुवर, डॉ. धनराज शेटे, वरिष्ठ लिपिक शंकर बहादुरे, मंगल काकडे, अरविंद भड प्रा. अर्शद खान सोबतच प्रा.डॉ. वर्षा बोपचे, डॉ. संगीता उमाळे, प्रा. सोनम गवळी, प्रा.योगिता मानमोडे, प्रा. जया फाये, प्रा.शिल्पा घाटोळे प्रा. आकांक्षा गोरले, ग्रंथपाल डॉ.संगीता चोरे आवर्जून कार्यक्रमाला उपस्थित होते.

रामकृष्ण वाघ महाविद्यालयांमध्ये अभिजात मराठी भाषा गौरव दिन उत्साहात साजरा

मराठी भाषेच्या समृद्ध परंपरेचे जतन करणे काळाची गरज



कोरडी /दिलीप वेवले: -

छत्रपती शाहू महाराज शिक्षण संस्थेद्वारा संचालित रामकृष्ण कॉलेज ऑफ आर्ट्स अँड कॉमर्स येथे मराठी विभागाच्या वतीने अभिजात मराठी भाषा गौरव दिन उत्साहात साजरा करण्यात आला. मराठी भाषेला अभिजात भाषेचा दर्जा मिळाल्याच्या गौरवा प्रित्यर्थ या कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले. याप्रसंगी व्यासपीठावर प्रभारी प्राचार्य प्रा.पंकज झगडे, सर्व शाखा विभाग प्रमुख प्रा दीपक ठाकरे ,सांस्कृतिक व वाणिज्य विभाग प्रमुख प्रा.किरण पांडे उपस्थित होते. कार्यक्रमाच्या सुरुवातीला सरस्वती मातेचे पूजन करून दीप प्रज्वलन करण्यात आले. मराठी हे केवळ संवादाची भाषा नसून महाराष्ट्राच्या संस्कृतीचे आणि अस्मितेची ओळख असल्याचे सांगितले. मराठी भाषेचा अधिकाधिक वापर करून तिचे जतन व संवर्धन आणि प्रचार प्रसार करण्याची जबाबदारी प्रत्येकाची आहे असे अध्यक्षीय मनोगतातून प्रभारी प्राचार्य प्रा. पंकज झगडे यांनी व्यक्त केले. सर्व शाखा विभाग प्रमुख प्रा. दीपक ठाकरे यांनी मराठी भाषेचा समृद्ध इतिहास प्राचीन साहित्य परंपरा आणि संत साहित्याचे महत्व मनोगतातून व्यक्त केले.

कार्यक्रमाला संस्थेचे संस्थापक सचिव प्राचार्य डॉ.मारोती वाघ, संस्थेच्या संचालिका प्राचार्या डॉ. लता वाघ यांचे मार्गदर्शन लाभले. कार्यक्रमाचे प्रास्ताविक प्रा. अश्विनी नंदेश्वर यांनी केले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन प्रा. सुषमा वडस्कर यांनी केले. आभार प्रदर्शन प्रा.मोहिनी सोनवणे यांनी केले. कार्यक्रमाला सर्व प्राध्यापक वृंद व विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

रामकृष्ण वाघ महाविद्यालयामध्ये राष्ट्रपिता महात्मा गांधी व लालबहादूर शास्त्री जयंती



कोरडी दिलीप वेवले: -

छत्रपती शाहू महाराज शिक्षण संस्थेद्वारा संचालित रामकृष्ण वाघ कॉलेज ऑफ आर्ट्स अँड कॉमर्स येथे राष्ट्रपिता महात्मा गांधी व लालबहादूर शास्त्री यांची जयंती उत्साहात साजरी करण्यात आली. याप्रसंगी व्यासपीठावर प्रभारी प्राचार्य प्रा. पंकज झगडे, सर्व शाखा विभाग प्रमुख प्रा. दीपक ठाकरे, सांस्कृतिक व वाणिज्य विभाग प्रमुख प्रा. किरण पांडे उपस्थित होते. कार्यक्रमाच्या प्रारंभी राष्ट्रपिता महात्मा गांधी व लालबाग शास्त्री यांच्या प्रतिमेचे पूजन करून दीप प्रज्वलन करण्यात आले. यावेळी अध्यक्ष स्थानावरून बोलताना प्रभारी प्राचार्य यांनी महात्मा गांधी यांच्या सत्य, अहिंसा, स्वच्छता आणि शांततेच्या विचारांचे महत्व विद्यार्थ्यांना समजावून सांगितले. गांधीजींनी सत्याग्रह आणि अहिंसेच्या मार्गाने स्वातंत्र्य चळवळीला व्यापक स्वरूप दिले. त्यांच्या विचारातून आजच्या पिढीने सत्य, शिस्त आणि सामाजिक जबाबदारीची प्रेरणा घ्यावी, असे त्यांनी सांगितले. प्रा. किरण पांडे यांनी लालबहादूर शास्त्री यांच्या साधेपणा, प्रामाणिकपणा, कर्तव्यनिष्ठ आणि समाजसेवेचा उल्लेख केला. देशाच्या प्रगतीमध्ये शेतकरी आणि जवानांचे योगदान महत्त्वाचे असून शास्त्रीजींचा 'जय जवान , जय किसान ' हा संदेश आजही प्रेरणादायी आहे, असे सांगितले. वाणि प्रथम वर्षाची विद्यार्थिनी माधुरी लोणारे हिने महात्मा गांधीजींच्या जीवनकार्याचा प्रकाश टाकला.

कार्यक्रमाला संस्थेचे संस्थापक सचिव प्राचार्य डॉ. मारोती वाघ, संस्थेच्या संचालिका प्राचार्या डॉ. लता वाघ यांचे मार्गदर्शन लाभले. कार्यक्रमाचे प्रास्ताविक प्रा. सुषमा वडस्कर यांनी केले. आभार प्रदर्शन प्रा. सोनली काबळे यांनी केले. सूत्रसंचालन प्रा. मोसम सिंग यांनी केले. कार्यक्रमाची सांगता राष्ट्र गीताने झाली. कार्यक्रमाला सर्व प्राध्यापक वृंद व विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

अधिकाऱ्यांनी मुख्यालय न सोडता फिल्ड' वर काम करावे !



महसूल मंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांच्या सूचना

दुष्काळाला समर्थपणे सामोरे जाऊ

अकोला येथे दुष्काळग्रस्त परिस्थितीचा घेतला आढावा

सुमारे ३०० नागरिकांची स्वीकारली निवेदने

बँक अधिकारी व सावकारांचा थकबाकीसाठी शेतकऱ्यांकडे तगादा नको

बँक व सावकारांच्या तगाद्यावर बंदी:

कर्जाचा हप्ता थकला तरी कोणत्याही बँकेने किंवा खाजगी सावकाराने शेतकऱ्यांना त्रास देऊ नये. तसेच खाजगी सावकारांनी शेतकऱ्यांना वेठीस धरू नये.

कर्जमाफी व वारस नोंदीचे काम वेगाने:

ज्या शेतकऱ्यांना कर्जमाफी झाली आहे मात्र वारसांची नोंद न झाल्यामुळे लाभ मिळाला नाही, त्यांच्या वारस नोंदी तातडीने पूर्ण करून घेण्याच्या सूचना देण्यात आल्या आहेत.

उपाययोजनाबाबत अधिकाऱ्यांना सूचना

दुष्काळाच्या परिस्थितीची अकोला जिल्ह्यातील येवता आणि बाळापूर तालुक्यातील मानकी देगाव येथील शेतकऱ्यांच्या बांधावर जाऊन पाहणी केली. तर पारस येथे लोकांची निवेदने स्वीकारली. आचारसंहिता असल्याने बैठक न घेता यावेळी त्यांनी अधिकाऱ्यांशी चर्चा करत दुष्काळ परिस्थितीत पुढील काळात घ्यावयाची काळजी आणि नियोजन याबाबत सूचना दिल्या.

नागपूर/ दिलीप वेवले

'पंचायत ते पार्लमेंट' आणि 'तलाठी ते मुख्य सचिव' अशी यंत्रणा सतर्क ठेवण्यात आली आहे. अधिकाऱ्यांनी मुख्यालयात न सोडता फिल्ड'वर काम करावे. दुष्काळ कितीही गंभीर असला तरीही शासन शेतकऱ्यांच्या पाठिशी खंबीरपणे उभे आहे. कोणीही आत्महत्येसारखा मार्ग निवडू नये, अशी कळकळीची विनंती आहे. दुष्काळी परिस्थितीला सामोरे जाऊ असा विश्वास महसूलमंत्री तथा दुष्काळ निवारण मंत्रीमंडळ उपसमितीचे अध्यक्ष चंद्रशेखर बावनकुळे यांनी दिला. छत्रपती संभाजीनगर आणि जालन्यानंतर दुष्काळ निवारण मंत्रीमंडळ उपसमितीचे अध्यक्ष चंद्रशेखर बावनकुळे यांनी अकोला जिल्ह्यातील येवता आणि बाळापूर तालुक्यातील मानकी देगाव आणि पारस या गावांचा दौरा केला. अकोला येथे नागरिकांशी संवाद साधत त्यांनी सुमारे पाचशेहून अधिक निवेदने स्वीकारली. त्यानंतर ते पत्रकारांशी बोलत होते.

बावनकुळे म्हणाले, शेतकऱ्यांच्या पिकांचे अचूक पंचनामे पूर्ण झाल्यावर ट्रिगर १ व ट्रिगर २ नुसार केंद्र, राज्य शासन आणि पीक विमा कंपन्यांमार्फत जास्तीत जास्त मदत दिली जाईल. दिवाळीपूर्वी शेतकऱ्यांना आर्थिक मदत देण्याबाबत सरकार अत्यंत सकारात्मक आहे. केंद्राच्या मदतीची वाट न पाहता राज्य सरकार तातडीने पावले उचलत आहे. केंद्राने प्रस्तावाऐवजी थेट आपली पाहणी टीम पाठवण्याचा निर्णय घेतला आहे. त्यामुळे ग्राम महसूल अधिकारी, कृषी अधिकारी आणि ग्रामसेवकांनी स्वतः शेतावर जाऊन अचूक पंचनामे करावेत, त्यावर शेतकऱ्याची सही घ्यावी असे निर्देश देण्यात आले आहेत.

तायवाडे महाविद्यालयातील राष्ट्रीय सेवा योजना युनिट तर्फे पर्यावरण संरक्षण व स्वच्छता अभियान या विषयावर व्याख्यानाचे आयोजन



कोरांडी/ दिलीप वेवले: -

श्री सचिदानंद शिक्षण संस्था, नागपूर , द्वारा संचालित तायवाडे कॉलेज, महादुला-कोरडीतील राष्ट्रीय सेवा योजने अंतर्गत पर्यावरण संरक्षण व स्वच्छता अभियान या विषयावर व्याख्यान कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले. हा कार्यक्रम महाविद्यालयाच्या प्राचार्य डॉ.शरयू तायवाडे यांच्या मार्गदर्शनाखाली राबविण्यात आला. या कार्यक्रमाला महाविद्यालयाच्या कला विभागाच्या प्रमुख डॉ. वर्षा वैद्य, भौतिक शास्त्र विभागाचे डॉ. कमलेश ढाबरे आणि राष्ट्रीय सेवा योजना कार्यक्रम अधिकारी डॉ.वकील शेख मंचावर उपस्थित होते. या कार्यक्रमात डॉ .वकील शेख यांनी विद्यार्थ्यांना पर्यावरणाचे संरक्षण करण्यासाठी प्रत्येकाने प्रयत्नशील असावे व पर्यावरणाचा -हास कसा थांबेल आणि आपल्या आजुबाजूचा परिसर कसा आपण स्वच्छ ठेवला पाहिजे जेणेकरून घाण निर्माण न होता आपले आरोग्य सदैव चांगले राहिल यासंबंधी मार्गदर्शन केले. या कार्यक्रमाला महाविद्यालयातील राष्ट्रीय सेवा योजनेच्या स्वयंसेवकांनी उस्फुर्त असा प्रतिसाद दिला.

दुर्गोत्सव शांततेत साजरा करण्याचे आवाहन; आष्टी पोलीस ठाण्यात शांतता बैठक

प्रतिनिधी - प्रितम गायकी

आष्टी : आगामी दुर्गोत्सवाच्या पार्श्वभूमीवर आष्टी पोलीस ठाण्यात शांतता समिती व दुर्गोत्सव समितीची बैठक घेण्यात आली. दुर्गोत्सव उत्साहात, शांततेत आणि कायदा-सुव्यवस्थेचे पालन करून साजरा व्हावा, या उद्देशाने आयोजित बैठकीत तालुक्यातील विविध दुर्गोत्सव मंडळांचे अध्यक्ष, पदाधिकारी, सदस्य व कार्यकर्ते उपस्थित होते.

ही बैठक आष्टी पोलीस ठाण्याचे पोलीस निरीक्षण देविदास गजरे तसेच पोलीस उपनिरीक्षक निलेश भिलावे यांच्या उपस्थितीत पार पडली. यावेळी पोलिस प्रशासनाने दुर्गोत्सवाच्या काळात मंडळांनी घ्यावयाची काळजी आणि शासनाच्या नियमांचे काटेकोरपणे पालन करण्याबाबत मार्गदर्शन केले.

बैठकीत डीजेच्या वापराबाबत असलेले निर्बंध तसेच ध्वनी प्रदूषणासंदर्भातील शासनाच्या नियमांची माहिती मंडळांच्या पदाधिकाऱ्यांना देण्यात आली. निर्धारित ध्वनीमर्यादा व वेळेचे पालन करावे, तसेच नागरिकांना त्रास होणार नाही याची काळजी घ्यावी, अशा सूचना देण्यात आल्या.

तसेच डीजेसोबत वापरण्यात येणाऱ्या अत्यंत तीव्र प्रकाशझोत देणाऱ्या 'शार्प लाईट्स'मुळे डोळ्यांना होणाऱ्या संभाव्य त्रासाचा विचार करून अशा लाईट्सच्या वापरावर निर्बंध असल्याचे पोलिस प्रशासनाकडून स्पष्ट करण्यात आले.



विशेषतः दुर्गादेवी विसर्जनाच्या दिवशी कोणत्याही प्रकारचे भांडण, वादविवाद किंवा अनुचित प्रकार घडणार नाहीत, याकडे मंडळांच्या पदाधिकाऱ्यांनी आणि कार्यकर्त्यांनी काटेकोरपणे लक्ष द्यावे, अशा स्पष्ट सूचना यावेळी देण्यात आल्या. विसर्जन मिरवणुकीदरम्यान परस्परांमध्ये वाद होऊ नये, कायदा-सुव्यवस्था बिघडू नये आणि सर्वांनी संयमाने व जबाबदारीने वागावे, असे आवाहन करण्यात आले.

दुर्गोत्सव हा श्रद्धा, सामाजिक एकोपा आणि उत्साहाचा सण असल्याने सर्व मंडळांनी पोलिस प्रशासनाला सहकार्य करून नियमांचे पालन करावे. उत्सव शांततेत व आनंदात पार पाडण्यासाठी प्रत्येक मंडळाने आपली जबाबदारी पार पाडावी, असे आवाहन पोलिस प्रशासनाने केले.

बैठकीला उपस्थित मंडळांच्या पदाधिकाऱ्यांनी पोलिस प्रशासनाच्या सूचनांचे पालन करून दुर्गोत्सव शांततेत पार पाडण्याचे आश्वासन दिले.

इंडियन मिलिटरी स्कूलमध्ये राष्ट्रपिता महात्मा गांधी आणि माजी पंतप्रधान लाल बहादूर शास्त्री यांची जयंती उत्साहात

'कमांडंट कर्नल के. एच. पाटील' यांच्या अध्यक्षतेखाली कार्यक्रमाचे आयोजन; मान्यवरांकडून दोन्ही महापुरुषांच्या विचारांना उजाळा



विरळ आकाजी : इंडियन मिलिटरी स्कूल, पुलगाव येथे आज २ ऑक्टोबर रोजी राष्ट्रपिता महात्मा गांधी आणि भारताचे माजी पंतप्रधान लाल बहादूर शास्त्री यांची जयंती अत्यंत उत्साहात आणि देशप्रेमाच्या वातावरणात साजरी करण्यात आली. शाळेचे कमांडंट कर्नल के. एच. पाटील यांनी या कार्यक्रमाचे अध्यक्षस्थान भूषवले.

कार्यक्रमाची सुरुवात मान्यवरांच्या हस्ते महात्मा गांधी आणि लालबहादूर शास्त्री यांच्या प्रतिमांचे पूजन व माल्यार्पण करून झाली.

याप्रसंगी शाळेचे प्राचार्य श्री नितीन कोठे हे मुख्य पाहुणे म्हणून उपस्थित होते. तसेच श्री उमेश खंडार यांनी प्रमुख अतिथी आणि श्री मनोज लोटे सर यांनी अतिथी म्हणून कार्यक्रमाला विशेष शोभा आणली. विद्यार्थ्यांचे मनोगत आणि राष्ट्रभक्तीचा जागर याप्रसंगी शाळेतील कॅडेट्सनी दोन्ही महापुरुषांच्या जीवन प्रवासावर आणि त्यांच्या विचारांवर आपली मनोगते व्यक्त केली. गांधीजींचे 'सत्य आणि अहिंसेचे' विचार तसेच शास्त्रीजींचा 'जय जवान, जय किसान' हा नारा आजच्या तरुण पिढीसाठी कसा मार्गदर्शक आहे, हे विद्यार्थ्यांनी आपल्या भाषणातून प्रभावीपणे मांडले.

मान्यवरांचे मोलाचे मार्गदर्शन कमांडंट कर्नल के. एच. पाटील आणि उपस्थित पाहुण्यांनी कॅडेट्सना मार्गदर्शन केले. देशासाठी आपले जीवन समर्पित करणाऱ्या या दोन्ही महान नेत्यांचे आदर्श सैनिकी शाळेतील विद्यार्थ्यांनी आपल्या जीवनात अंगीकारावला हवेत, असा संदेश मान्यवरांनी आपल्या भाषणातून दिला. देशसेवा, शिस्त आणि प्रामाणिकपणा या मूल्यांवर त्यांनी विशेष भर दिला.

मानधन व इतर मागण्यांसाठी आर्वी तालुक्यातील ग्रामरोजगार सेवकांचे काम बंद



विरळ आकाजी : शासन निर्णयानुसार मंजूर झालेले मानधन आणि इतर विविध मागण्यांची अंमलबजावणी न झाल्यामुळे आर्वी तालुका 'ग्रामरोजगार सेवक संघटने'च्या वतीने १ ऑक्टोबरपासून काम बंद आंदोलनात सहभाग नोंदवला आहे. या संदर्भात संघटनेने गटविकास अधिकारी, तहसीलदार, तालुका कृषि अधिकारी आणि वन परिक्षेत्र अधिकाऱ्यांना निवेदन सादर केले आहे.

निवेदनानुसार, महात्मा गांधी राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी योजनेची (मनरेगा) प्रत्येक ग्रामपंचायत स्तरावर प्रभावी अंमलबजावणी करण्याचे काम ग्रामरोजगार सेवक अल्पशा मानधनावर करत आहेत. ग्रामरोजगार सेवकांकडून मजुरांच्या रोजगाराची मागणी नोंदवणे, जॉबकार्ड तयार करणे व अद्ययावत ठेवणे, मजुरांची नोंदणी, कामाची मागणी, मस्टर व ऑनलाइन नोंदी, विविध अहवाल तयार करणे तसेच शासनाच्या सूचनांची ग्रामपातळीवर अंमलबजावणी करणे ही कामे नियमितपणे केली जातात.

मात्र, ३ ऑक्टोबर २०२४ च्या शासन निर्णयानुसार मंजूर झालेले मानधन तसेच अन्य प्रलंबित मागण्या पूर्ण न झाल्याने संपूर्ण राज्य व जिल्ह्यात सुरू असलेल्या काम बंद आंदोलनाला पाठिंबा देत आर्वी तालुक्यातील सर्व ग्रामरोजगार सेवकही आंदोलनात सहभागी झाले आहेत. मागण्या त्वरित मान्य न झाल्यास आंदोलन तीव्र करण्याचा इशारा संघटनेच्या पदाधिकाऱ्यांनी दिला आहे.

महात्मा गांधी व लालबहादूर शास्त्री जयंतीनिमित्त ऱ्ण कॅडेट्सचा 'एक पेड माँ के नाम' उपक्रम



सेलू/ प्रशांत झाडे

राष्ट्रपिता महात्मा गांधी व भारताचे माजी पंतप्रधान लालबहादूर शास्त्री यांच्या जयंतीनिमित्तरा. सु. बिडकर महाविद्यालय, हिंगणघाट येथे ऱ्ण कॅडेट्सच्या वतीने 'एक पेड माँ के नाम' या पर्यावरणपूरक उपक्रमाचे आयोजन करण्यात आले.

या उपक्रमांतर्गत ऱ्ण कॅडेट्सनी महाविद्यालय परिसरात विविध वृक्षांची लागवड करून पर्यावरण संवर्धनाचा संदेश दिला. वृक्षारोपणासोबतच लावलेल्या झाडांचे संगोपन व संवर्धन करण्याचा संकल्प कॅडेट्सनी केला.

महात्मा गांधी यांच्या स्वच्छता, अहिंसा आणि पर्यावरणपूरक जीवनशैलीच्या विचारांना तसेच लालबहादूर शास्त्री यांच्या साधेपणा, कर्तव्यनिष्ठा व देशसेवेच्या विचारांना अभिवादन करत ऱ्ण कॅडेट्सनी सामाजिक बांधिलकीचे दर्शन घडविले.

प्राचार्य डॉ बी. एम. राजूरकर मार्गदर्शन करताना 'एक पेड माँ के नाम' हा उपक्रम केवळ वृक्षारोपणापुरता मर्यादित न ठेवता प्रत्येकाने पर्यावरणाचे संरक्षण करण्यासाठी पुढाकार घ्यावा, असा संदेश देणारा ठरला. महात्मा गांधी यांच्या स्वच्छता, अहिंसा व साधेपणाच्या विचारांसोबतच लालबहादूर शास्त्री यांच्या 'जय जवान, जय किसान' या प्रेरणादायी विचारांचे स्मरण यावेळी करण्यात आले.

एनसीसी अधिकारी कॅप्टन डॉ रमेश एम. भगत पर्यावरणाचे रक्षण ही प्रत्येक नागरिकाची जबाबदारी असून, वृक्षारोपणापलीकडे लावलेल्या झाडांचे संगोपन करणे आवश्यक असल्याचे यावेळी सांगण्यात आले. ऱ्ण कॅडेट्सच्या उत्स्फूर्त सहभागामुळे महाविद्यालय परिसरात पर्यावरण संवर्धनाबाबत जनजागृती निर्माण झाली.

कार्यक्रमास प्राचार्य डॉ बी. एम. राजूरकर, ज्योत्स्ना जांभुळकर समता दूत तालुका हिंगणघाट, ज्ञानेश्वर बडोले समता दूत समुद्रपूर तालुका, महाविद्यालयातील प्राध्यापक चंद्रशेखर कुटे, डॉ एस. के. मस्के, डॉ शरद बिहीरकर, डॉ बलराज अवचट, डॉ मिलिंद तेलंग, डॉ जी.बी. ठक, डॉ अनिल बाभळे, डॉ रवींद्र महाकाळे, डॉ जयंत शेंडे, प्रा विनोद पुनवटकर, प्रा प्रमोद वानखेडे, डॉ कमलकिशोर इंगोले, डॉ किशोर भूते, डॉ अरविंद सोमनाथे, डॉ कमलाकर नवघरे तसेच कनिष्ठ महाविद्यालयाचे शिंदे सर, पानसे मॅडम, गंधारे मॅडम, मोते सर, मुंडे सर व शिक्षकेतर कर्मचारी व विद्यार्थी उपस्थित होते. ऱ्ण अधिकारी कॅप्टन डॉ. रमेश एम. भगत यांच्या मार्गदर्शनाखाली सीनियर अंडर ऑफिसर श्रेया ठाकरे, सिनिअर अंडर ऑफिसर ओम मेसरे, जुनियर अंडर ऑफिसर प्राजक्ता महोदरे, जूनियर अंडर ऑफिसर सोहम दांडगे व १३६ ऱ्ण कॅडेट्सनी उपक्रम यशस्वीपणे पार पाडला.

करांटे स्पर्धेत विद्यार्थ्यांचे घवघवीत यश



सेलू. प्रशांत झाडे

खेळ क्रीडा युवक संचालनालय, वर्धा अंतर्गत तालुकास्तरीय कराटे स्पर्धा नुकतीच क्रीडा संकुल सेलू या ठिकाणी पार पडली.या स्पर्धेमध्ये यशवंत विद्यालय हिंगणी येथील १४ वयोगटातील दोन विद्यार्थी व दोन विद्यार्थिनी विजयी झाल्या. त्यांची निवड जिल्हा स्तरावर झाली. यशवंत विद्यालय हिंगणी येथील १७ वयोगटातील एक विद्यार्थी व एक विद्यार्थिनी विजयी झाल्या. सदर विद्यार्थ्यांची निवड जिल्हा स्तरावर झाली. या विद्यार्थ्यांसाठी अथक परिश्रम घेणारे गावातील कराटे प्रशिक्षक सलीम शेख, क्रीडा शिक्षक सन्मानीय चौधरी सर, मयूर देवडे यांनी विद्यार्थ्यांना शुभेच्छा दिल्या. शाळेतील सन्मानीय मुख्याध्यापक श्रीमान ठाकरे सर, यांनी विद्यार्थ्यांना जिल्हास्तरावरून विभागीय स्तरावर निवड झाली पाहिजे असे मत व्यक्त केले तसेच विद्यार्थ्यांचे पुष्पगुच्छ देऊन स्वागत तसेच अभिनंदन करत पुढील वाटचालीसाठी शुभेच्छा दिल्या. शाळेतील सर्व शिक्षक शिक्षिका शिक्षकेतर कर्मचारी यांनी सुद्धा विद्यार्थ्यांना पुढील वाटचालीसाठी शुभेच्छा दिल्या.

वन्यजीव सप्ताह व सेवा संकल्प अभियानांतर्गत सुसुंद्रा येथे ग्राम स्वच्छता अभियान संपन्न



कारंजा: १ ते ७ ऑक्टोबर दरम्यान साजऱ्या होणाऱ्या वन्यजीव सप्ताह व सेवा संकल्प अभियानाच्या निमित्ताने दिनांक ३ ऑक्टोबर रोजी सुसुंद्रा गावामध्ये व्यापक पातळीवर 'ग्राम स्वच्छता अभियान' उत्साहात राबवियात आले. हे अभियान सामाजिक वनीकरण परिक्षेत्र कारंजा, संत भाकरे महाराज विद्यालय सुसुंद्रा आणि जिल्हा परिषद शाळा सुसुंद्रा यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित करण्यात आले होते.

?या अभियानांतर्गत गावात सर्वत्र स्वच्छता मोहीम राबवून परिसर चकाचक करण्यात आला. यावेळी सामाजिक वनीकरण विभागाचे वनपरिक्षेत्र अधिकारी श्री. आर. एस. उमक आणि संत भाकरे महाराज विद्यालयाचे मुख्याध्यापक श्री. एच. एम. चाके यांनी विद्यार्थी व गावकऱ्यांना मार्गदर्शन करताना दैनंदिन जीवनातील स्वच्छतेचे आणि पर्यावरण संवर्धनाचे महत्त्व पटवून दिले.

?सदर मोहिमेमध्ये सामाजिक वनीकरण विभागाचे वनरक्षक श्री. प्रकाश देशभ्रतार, वनकर्मचारी श्री. गणेश माहुरिया, श्री. राजू काळे उपस्थित होते. तसेच संत भाकरे महाराज विद्यालयाचे सहाय्यक शिक्षक श्री. आर. एस. हिंगवे, श्री. ए. एस. वऱ्हेकर, श्री. एम. एस. बोडखे, श्री. के. जी. ढोक, शिक्षकेतर कर्मचारी श्री. एन. आर. करडे, श्री. पी. बी. धुर्वे, श्री. एस. सोमकुवर, श्री. नारायण पठाळे, जिल्हा परिषद शाळेचे मुख्याध्यापक श्री. ठोंबरे, सहाय्यक शिक्षक श्री. धोंदे, श्री. साबळे, श्री. यावलकर यांच्यासह दोन्ही शाळांचे विद्यार्थी आणि गावातील नागरिक मोठ्या संख्येने या उपक्रमात सहभागी झाले होते.

पर्यावरण संवर्धनासाठी आष्टीत युवकांची धाव

वन्यजीव सप्ताहानिमित्त वनविभागाची मॅरेथॉन; विद्यार्थ्यांचा उत्स्फूर्त सहभाग

आष्टी (शहीद) : प्रतिनिधी

वन्यजीव संरक्षण, वनसंवर्धन आणि पर्यावरण रक्षणाबाबत युवकांमध्ये जनजागृती निर्माण करण्याच्या उद्देशाने आष्टी वनविभागाच्या वतीने वन्यजीव सप्ताहानिमित्त आयोजित करण्यात आलेल्या मॅरेथॉन स्पर्धेला विद्यार्थी-विद्यार्थिनींचा उत्स्फूर्त प्रतिसाद मिळाला. पर्यावरण संवर्धनाचा संदेश देत युवकांनी धाव घेतली.

१ ते ७ ऑक्टोबरदरम्यान साजरा करण्यात येत असलेल्या वन्यजीव सप्ताहाच्या निमित्ताने आष्टी वनविभागाकडून विविध जनजागृतीपर उपक्रम राबवियात येत आहेत. त्याचाच एक भाग म्हणून मुलांसाठी तीन किलोमीटर, तर मुलींसाठी दोन किलोमीटर धावण्याच्या स्पर्धेचे आयोजन करण्यात आले.

कार्यक्रमाच्या प्रारंभी राष्ट्रपिता महात्मा गांधी यांच्या प्रतिमेचे पूजन करण्यात आले. त्यानंतर



वनपरिक्षेत्र अधिकारी पूनम ब्राम्हणे, आष्टी पोलीस ठाण्याचे ठाणेदार देविदास गजरे, सपोनि प्रितम गायकी तसेच आष्टी तालुका पत्रकार संरक्षण समितीचे अध्यक्ष शिवाजी चंदीवाले यांच्या प्रमुख उपस्थितीत ठाणेदार देविदास गजरे यांनी हिरवी झेंडी दाखवून मॅरेथॉनला सुरुवात केली. यावेळी वनपाल देविदास धुर्वे, मडवे, आडे यांच्यासह वनविभागाचे कर्मचारी उपस्थित होते.

मुलांच्या तीन किलोमीटर दौडीत राजेंद्र साखरकर याने प्रथम क्रमांक पटकावला. प्रणव चारपे याने द्वितीय, तर सुमित गडदे आणि कार्तिक सकरडे यांनी अनुक्रमे तृतीय क्रमांक मिळविला.

मुलींच्या दोन किलोमीटर दौडीत गौरी राठोड हिने प्रथम क्रमांक पटकावला. वैष्णवी मदनकर हिने द्वितीय, तर सोनाली नेहारे हिने तृतीय क्रमांक मिळविला.

मॅरेथॉनच्या मार्गावर धावपटूंना कोणताही अडथळा निर्माण होऊ नये तसेच वाहतुकीची कोंडी होऊ नये, यासाठी वनकर्मचारी ठिकठिकाणी तैनात करण्यात आले होते. आवश्यक ठिकाणी बॅरिकेड्स लावण्यात आले होते. त्यामुळे स्पर्धा सुरक्षित आणि शिस्तबद्ध वातावरणात पार पडली.

वन्यजीव सप्ताहाच्या माध्यमातून विद्यार्थ्यांमध्ये वन्यप्राणी संरक्षण, वनसंवर्धन आणि पर्यावरण रक्षणाची जाणीव निर्माण करण्याचा प्रयत्न वनविभागाकडून करण्यात येत आहे. मॅरेथॉनच्या माध्यमातून आरोग्याबरोबरच पर्यावरण संवर्धनाचा संदेश युवकांपर्यंत पोहोचविण्यात आला.

स्पर्धेतील विजेत्यांना तसेच सहभागी विद्यार्थ्यांना ८ ऑक्टोबर रोजी वक्षीस वितरण करून गौरविण्यात येणार आहे.

स्पर्धेच्या यशस्वी आयोजनासाठी वनकर्मचारी साखरकर, राम गायकवाड, स्वाती कडू, शिवाजी जायभाये, दिगंबर गणेशपुरे, डाखोरे, अंभोरे, भोसले, बुरे, कु. कोल्हे, सौ. जायभाये, होले आदींसह वनकर्मचाऱ्यांनी परिश्रम घेतले.

वनसप्ताहानिमित्त बोरी कोकाटे येथे वनदिंडीचा जल्लोष; सात दिवस विविध कार्यक्रमांचे आयोजन



सेलू./ प्रशांत झाडे

वनसप्ताहानिमित्त बोरी कोकाटे गावात वनदिंडी काढून पर्यावरण संवर्धनाचा संदेश देण्यात आला. बोरीतील ग्रामस्थ आणि हिंगणी वनविभाग यांच्या संयुक्त विद्यमाने वनसप्ताह उत्साहात साजरा करण्यात येत असून, यानिमित्ताने परिसरात सात दिवस विविध कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले आहे.

वनसप्ताहाच्या प्रारंभानिमित्त टाळ-मृदंगाच्या निनादात गावातून प्रभातफेरी काढण्यात आली. यावेळी ग्रामस्थ, वनविभागाचे अधिकारी व कर्मचारी तसेच नागरिकांनी उत्स्फूर्त सहभाग घेतला. सकाळी ९ वाजता गावात रांगोळी स्पर्धेचे आयोजन करण्यात आले. तसेच शाळेत चित्रकला स्पर्धा, भाषण स्पर्धा, नृत्य आदी विविध उपक्रम घेण्यात येणार आहेत.

वनसंवर्धन, पर्यावरणाचे महत्त्व आणि वृक्ष लागवडीबाबत जनजागृती करण्याच्या उद्देशाने या कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले आहे. संपूर्ण सप्ताहात विविध उपक्रमांच्या माध्यमातून नागरिक व विद्यार्थ्यांमध्ये पर्यावरण संवर्धनाची भावना रुजविण्याचा प्रयत्न करण्यात येत आहे.

या उपक्रमासाठी बोरी कोकाटे गावातील राजू वाघाडे, कमलसिंह मरस्कोल्हे, समीर नेहारे, सागर किरडे, आदित्य गायकवाड, पिंटू जुगनाके, सारंग वानखेडे, गोविंदा पेटकर आदींचे सहकार्य लाभत आहे. कार्यक्रमाला एसीएफ अतुल लोंढे, वनपरिक्षेत्र अधिकारी (वफर) रूपेश खंडेकर, क्षेत्रसहायक उमेश शिरपुरकर, वनरक्षक गणेश जाधव यांच्यासह वनविभागातील कर्मचारी उपस्थित होते.

मराठी ही केवळ संवादाची भाषा नव्हे, तर संस्कृती-इतिहासाची साक्षीदार; डिजिटल युगात मराठीला ज्ञानभाषा करणार – मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस

मुंबई : मराठी भाषा ही केवळ संवादाचे माध्यम नाही, तर ती आपल्या समृद्ध संस्कृतीची वाहक आणि जाज्वल्य इतिहासाची साक्षीदार आहे. विपुल शब्दसंपदा, समृद्ध साहित्यपरंपरा आणि विविध बोलीभाषांचा वारसा लाभलेल्या मराठीला २१व्या शतकात डिजिटल आणि ज्ञानभाषा म्हणून अधिक सक्षम करण्यात येणार असल्याचे प्रतिपादन मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी केले.

मराठीचा दैनंदिन व्यवहारातील वापर वाढविण्यासोबतच कृत्रिम बुद्धिमत्ता (AI), डिजिटल तंत्रज्ञान, क्वांटम कॉम्प्युटिंग, स्पेस टेक्नॉलॉजी आणि बायोटेक्नॉलॉजीसारख्या आधुनिक क्षेत्रांमध्येही मराठीचा वापर वाढविण्याचे आवाहन त्यांनी केले.

मराठी भाषेला अभिजात भाषेचा दर्जा मिळाल्याच्या पार्श्वभूमीवर आयोजित 'अभिजात मराठी भाषा सप्ताह' आणि 'अभिजात मराठी भाषा सन्मान दिवस' कार्यक्रमाचा चर्चगेट येथील श्रीमती नाथीबाई दामोदर ठाकर्सी महिला विद्यापीठाच्या पाटकर सभागृहात उत्साहात शुभारंभ झाला. यावेळी आयोजित विशेष सोहळ्यात फडणवीस बोलत होते. यावेळी उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे, मराठी भाषा व उद्योगमंत्री डॉ. उदय सामंत, मुंबईच्या महापौर रितू तावडे, विद्यापीठाच्या कुलगुरू डॉ. हेमलता बागला, मराठी भाषा विभागाचे सचिव किरण कुलकर्णी यांच्यासह मान्यवर, शिक्षक, विद्यार्थी आणि मराठीप्रेमी उपस्थित होते.

मराठीला अभिजात भाषेचा दर्जा हा अभिमानाचा क्षण

मराठी भाषा प्राचीन आणि अभिजात आहेच; मात्र तिला केंद्र सरकारकडून अभिजात भाषेची अधिकृत मान्यता मिळणे हा मराठी भाषकांसाठी अभिमानाचा क्षण असल्याचे फडणवीस यांनी सांगितले. प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांच्या नेतृत्वाखाली मराठीला अभिजात भाषेचा दर्जा मिळाल्याने महाराष्ट्राच्या भाषिक आणि सांस्कृतिक वारशाला राष्ट्रीय पातळीवर विशेष अधोरेखित स्थान मिळाले असल्याचे त्यांनी नमूद केले. छत्रपती शिवाजी महाराजांनी स्वराज्याच्या संकल्पनेसोबत स्वभाषेलाही महत्त्व दिले. राज्यकारभारात मराठीचा वापर वाढविण्यासाठी त्यांनी प्रयत्न केले आणि त्यातून मराठीच्या प्रशासकीय वापराला नवी दिशा मिळाली, अशी आठवणही फडणवीस यांनी यावेळी करून दिली.

मराठी शब्दसंपदा वाढविण्याची गरज

जगात सर्वाधिक बोलल्या जाणाऱ्या भाषांमध्ये मराठीचा १३वा क्रमांक असल्याचे सांगून मुख्यमंत्री फडणवीस म्हणाले की, मराठी ही जागतिक स्वरूपाची भाषा आहे. विसाव्या शतकात तयार झालेल्या मराठी ज्ञानकोश आणि शब्दरत्नाकरामध्ये ११ ते १३ लाख शब्द असल्याचा उल्लेख त्यांनी केला. तुलनेत ऑक्सफर्ड शब्दकोशात सुमारे सहा लाख शब्द, तर मँडरिन, स्पॅनिश आणि फ्रेंचसारख्या भाषांमध्ये साधारण तीन ते साडेतीन लाख शब्द असल्याचे त्यांनी सांगितले. राज्य शासनाच्या प्रकाशित मराठी शब्दकोशात सध्या सुमारे तीन लाख शब्द आहेत. त्याच्या पुढील आवृत्त्या तयार करून शब्दसंपदा १३ लाख शब्दांपर्यंत नेण्याचे काम करण्याची गरज मुख्यमंत्र्यांनी यावेळी अधोरेखित केली.



मराठीच्या समृद्ध शब्दसंपदेचा उल्लेख करताना फडणवीस यांनी मराठी ज्ञानकोश आणि शब्दकोशांच्या परंपरेचे महत्त्व अधोरेखित केले. विविध कोशांमध्ये लाखो मराठी शब्द नोंदविले गेले असून, ही शब्दसंपदा मराठीच्या समृद्ध भाषिक परंपरेचे दर्शन घडवते, असे त्यांनी सांगितले. मराठीचा हा शब्दवैभव केवळ अभिमानाचा विषय न राहता आधुनिक ज्ञाननिर्मितीमध्येही त्याचा प्रभावी वापर झाला पाहिजे. विज्ञान, तंत्रज्ञान, अर्थव्यवस्था, शिक्षण आणि संशोधनाच्या क्षेत्रातील संकल्पना मराठीत उपलब्ध झाल्यास मराठी खऱ्या अर्थाने ज्ञानभाषा बनेल, असे त्यांनी स्पष्ट केले.

'मराठी AI'च्या माध्यमातून नव्या युगाशी नाते

डिजिटल तंत्रज्ञानामुळे संवादाची माध्यमे वेगाने बदलत आहेत. अशा परिस्थितीत मराठीला केवळ पारंपरिक वापरापुरते मर्यादित न ठेवता नव्या तंत्रज्ञानाशी जोडणे आवश्यक आहे, असे फडणवीस यांनी सांगितले. 'मराठी ''ई'च्या माध्यमातून कृत्रिम बुद्धिमत्तेच्या क्षेत्रात मराठीचा प्रभावी वापर वाढविणे, डिजिटल माध्यमांवर मराठीतील माहिती आणि ज्ञानसामग्री उपलब्ध करून देणे, तसेच ओटीटी प्लॅटफॉर्म आणि सोशल मीडियावर दर्जेदार मराठी कंटेंट मोठ्या प्रमाणात निर्माण करणे गरजेचे आहे, असे त्यांनी नमूद केले.

क्वांटम कॉम्प्युटिंग, स्पेस टेक्नॉलॉजी, बायोटेक्नॉलॉजी यांसारख्या अत्याधुनिक क्षेत्रांमध्ये मराठीतील ज्ञानसामग्री उपलब्ध झाल्यास नव्या पिढीला मातृभाषेतून आधुनिक ज्ञान आत्मसात करण्याची संधी मिळेल, असा विश्वासही त्यांनी व्यक्त केला.

बोलीभाषांचा गोडवाही जपला पाहिजे

प्रमाण मराठीसोबतच महाराष्ट्राच्या विविध भागांमध्ये बोलल्या जाणाऱ्या बोलीभाषा हा मराठीचा अमूल्य ठेवा असल्याचे फडणवीस यांनी सांगितले. कोकणी, वऱ्हाडी, खानदेशी-अहिराणी, मालवणी, डांगी, झाडीबोली यांसारख्या बोलीभाषांमध्ये स्थानिक संस्कृती, लोकपरंपरा आणि जीवनानुभव सामावलेले आहेत. त्यामुळे या बोलींचे साहित्य, लोकपरंपरा आणि भाषिक वैशिष्ट्ये जतन करण्याची गरज त्यांनी व्यक्त केली.

मराठी नाट्यसंस्कृतीचाही त्यांनी विशेष उल्लेख केला. आधुनिक तंत्रज्ञानाची साधने मर्यादित असतानाही अनेक पिढ्यांनी मराठी रंगभूमीची समृद्ध परंपरा जिवंत ठेवली. कलावंतांनी आपल्या अभिनयातून, लेखनातून आणि प्रयोगशीलतेतून मराठी रंगभूमीला वेगळी ओळख मिळवून दिली. ही नाट्यपरंपरा मराठीच्या सांस्कृतिक सामर्थ्याचे वैशिष्ट्य असल्याचे फडणवीस यांनी नमूद केले.



कृषी पंपांचा वीजपुरवठा सुरळीत करण्यासाठी शेतकऱ्यांची महावितरण कार्यालयावर धडक

१२ तासांऐवजी सात-आठ तास नियमित वीजपुरवठ्याचा पर्याय; सोमवारपर्यंत सुधारणा करण्याचे अधिकाऱ्यांचे आश्वासन

आष्टी,(शहीद): कृषी पंपांसाठी सुरू असलेला वीजपुरवठा वारंवार खंडित होत असल्याने सिंचनावर परिणाम होत आहे. या समस्येचा जाब विचारण्यासाठी आष्टी शहर भाजप पदाधिकारी व कार्यकर्त्यांनी शनिवारी शेतकऱ्यांसह महावितरण कार्यालयावर धडक देत अधिकाऱ्यांशी चर्चा केली.

आमदार सुमित वानखेडे यांच्या प्रयत्नातून शेतकऱ्यांना सिंचनासाठी १२ तास वीजपुरवठा सुरू करण्यात आला आहे. मात्र, चारही फिडरवर एकाच वेळी मोठ्या प्रमाणात वीजभार वाढत असल्याने वारंवार वीजपुरवठा खंडित होत असल्याचे शेतकऱ्यांचे म्हणणे आहे. परिणामी पिकांना पुरेसे सिंचन करता येत नसल्याने शेतकऱ्यांना अडचणींचा सामना करावा लागत आहे.आष्टी उपविभागांतर्गत अंतोरा, खडकी, सारवाडी व साहूर असे चार फिडर आहेत. या सर्व फिडरवर एकाच वेळी १२ तास वीजपुरवठा सुरू केल्यामुळे वीजवाहिन्यांवर अतिरिक्त भार येत असून, तारा गरम होणे व तांत्रिक बिघाडाच्या समस्या निर्माण होत असल्याचे उपविभागीय अभियंता अमोल जयस्वाल व शहर अभियंता तुषार इखार यांनी शिष्टमंडळाला सांगितले.

दरम्यान, वारंवार खंडित होणाऱ्या १२ तासांच्या वीजपुरवठ्यापेक्षा सात-आठ तास नियमित वीजपुरवठा करावा, असा पर्याय शेतकरी व भाजप कार्यकर्त्यांनी अधिकाऱ्यांसमोर मांडला. दोन-दोन फिडरचे गट करून पर्यायी वेळापत्रक लागू केल्यास वीजभार नियंत्रित ठेवता येईल, अशी भूमिका यावेळी मांडण्यात आली.

यावेळी आमदार सुमित वानखेडे यांच्याशी भ्रमणध्वनीवरून चर्चा करण्यात आली. सध्याची समस्या दूर करण्यासाठी सात-आठ तासांच्या पर्यायी वीज वेळापत्रकाचा पर्याय विचारात घेण्यास त्यांनी सहमती दर्शविल्याचे शिष्टमंडळाने सांगितले.

सध्या दोन फिडर मिळून १२ तासांचे वेळापत्रक लागू करण्यात आले असून, सोमवारपर्यंत वीजपुरवठ्यात सुधारणा न झाल्यास शिष्टमंडळाने सुचविलेल्या पर्यायी वेळापत्रकाचा विचार करण्यात येईल, असे महावितरण अधिकाऱ्यांनी स्पष्ट केले.

शेतकऱ्यांनी सहकार्य करण्याचे आवाहन

वीजपुरवठा सुरळीत ठेवण्यासाठी महावितरणचे अधिकारी व कर्मचारी प्रयत्नशील असून, सोमवारपर्यंत समस्या मार्गी लावण्याचा प्रयत्न केला जाणार आहे. सुधारणा न झाल्यास सात-आठ तासांचा पर्यायी वीजपुरवठा करण्याचा पर्याय स्वीकारला जाऊ शकतो. त्यामुळे शेतकऱ्यांनी परिस्थिती समजून घेऊन सहकार्य करावे, असे आवाहन भाजप नेते अशोक विजयकर, शहराध्यक्ष नरेंद्र भनेरकर, नीरज भार्गव, सचिन गुप्ता तसेच शेतकरी दत्ता सत्पाळ, सचिन पाचघरे, अनिल इखार, सुधाकर निचत, चंद्रशेखर मदनकर, मंगेश कोहळे आदींनी केले.

मानधन व इतर मागण्यांसाठी आर्वी तालुक्यातील ग्रामरोजगार सेवकांचे काम बंद आंदोलन



आर्वी : शासन निर्णयानुसार मंजूर झालेले मानधन आणि इतर विविध मागण्यांची अंमलबजावणी न झाल्यामुळे आर्वी तालुका 'ग्रामरोजगार सेवक संघटने'च्या वतीने १ ऑक्टोबरपासून काम बंद आंदोलनात सहभाग नोंदवला आहे. या संदर्भात संघटनेने गटविकास अधिकारी, तहसीलदार, तालुका कृषि अधिकारी आणि वन परिक्षेत्र अधिकाऱ्यांना निवेदन सादर केले आहे.

निवेदनानुसार, महात्मा गांधी राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी योजनेची (मनरेगा) प्रत्येक ग्रामपंचायत स्तरावर प्रभावी अंमलबजावणी करण्याचे काम ग्रामरोजगार सेवक अल्पशा मानधनावर करत आहेत. ग्रामरोजगार सेवकांकडून मजुरांच्या रोजगाराची मागणी नोंदवणे, जॉबकार्ड तयार करणे व अद्ययावत ठेवणे, मजुरांची नोंदणी, कामाची मागणी, मस्टर व ऑनलाइन नोंदी, विविध अहवाल तयार करणे तसेच शासनाच्या सूचनांची ग्रामपातळीवर अंमलबजावणी करणे ही कामे नियमितपणे केली जातात.

मात्र, ३ ऑक्टोबर २०२४च्या शासन निर्णयानुसार मंजूर झालेले मानधन तसेच अन्य प्रलंबित मागण्या पूर्ण न झाल्याने संपूर्ण राज्य व जिल्ह्यात सुरू असलेल्या काम बंद आंदोलनाला पाठिंबा देत आर्वी तालुक्यातील सर्व ग्रामरोजगार सेवकही आंदोलनात सहभागी झाले आहेत. मागण्या त्वरित मान्य न झाल्यास आंदोलन तीव्र करण्याचा इशारा संघटनेच्या पदाधिकाऱ्यांनी दिला आहे.

आज शिक्षक समितीची नागपूर विभागस्तरीय कार्यशाळा

शिक्षण काल आज आणि उद्या या विषयावर भाऊ चासकर यांचे व्याख्यान.

वर्धा : महाराष्ट्र राज्य प्राथमिक शिक्षक समितीची नागपूर विभागीय कार्यशाळा रविवार दि. ४ ऑक्टोबर रोजी, देशमुख सभागृह व लॉन नागपूर रोड, वर्धा येथे संपन्न होत आहे.

कार्यशाळेचे उद्घाटन जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी पराग सोमण करतील. अध्यक्षस्थानी शिक्षक समितीचे राज्याध्यक्ष विजय कोंबे राहतील. विशेष अतिथी म्हणून राज्य नेते उदयराव शिंदे मार्गदर्शन करणार आहेत.?शिक्षण काल आज आणि उद्या या विषयावर शिक्षण विषयक अभ्यासक भाऊ चासकर अहिल्यानगर यांचे व्याख्यान यावेळी होणार आहे. वर्धा जिल्हा परिषदेचे सेवानिवृत्त शिक्षणाधिकारी धनराज तेलंगहे सेवा शर्ती, अपील नियम यावर आणि निवृत्तीवेतन वेतन निश्चिती या विषयावर जिल्हा परिषदेचे वरिष्ठ लेखा सहाय्यक आम्रपाल कांबळे मार्गदर्शन करतील. याप्रसंगी महाराष्ट्र राज्य प्राथमिक शिक्षक समितीचे राज्य उपाध्यक्ष राजन सावंत (सोलापूर), आनंदा कांदळकर (नाशिक), विलास कंटेकुरे (धाराशिव), राज्य सरचिटणीस राजन कोरगावकर (सिंधुदुर्ग), राज्य महिला आघाडी प्रमुख वर्षाताई केनवडे (कोल्हापूर), राज्य कार्याध्यक्ष सयाजी पाटील (सांगली), राज्य कोषाध्यक्ष नंदकुमार होळकर (पुणे), सातारा जिल्हा शाखेचे अध्यक्ष किरण यादव (सातारा), शिक्षक सहकारी बँकेचे अध्यक्ष विशाल कणसे, सोलापूर जिल्हा शाखेचे अध्यक्ष अमोगसिद्ध कोळी, कोल्हापूर जिल्हा शाखेचे अध्यक्ष आदी उपस्थित राहणार आहेत. नागपूर विभागातील नागपूर, वर्धा, गोंदिया, भंडारा, गडचिरोली व चंद्रपूर या जिल्ह्यातून शिक्षक समितीचे ३०० पेक्षा अधिक प्रतिनिधी या कार्यशाळेत सहभागी होणार आहेत.? कार्यशाळेच्या आयोजनासाठी विभाग प्रमुख किशोर डोंगरवार, विभाग उपप्रमुख अजय मोरे, जिल्हा नेते रामदास खेकारे, जिल्हा शाखेचे अध्यक्ष अजय बोबडे, राज्य कार्यकारिणी सदस्य सुधीर सगणे, जिल्हा सरचिटणीस श्रीकांत अहेरराव, पेन्शन आघाडीचे प्रमुख श्रीकांत केंडे, जिल्हा कार्यालय चिटणीस प्रशांत निंभोरकर, समाज माध्यम प्रमुख पवन बानोकर, कार्याध्यक्ष प्रदीप देशमुख, कोषाध्यक्ष विनीत आहाके, सुदेश खोब्रागडे, राजेश महाबुधे, महिला आघाडीच्या प्रमुख वैशाली देशमुख, महिला आघाडीच्या पदाधिकारी स्मिता गेडे, रामेश्वर भगत, प्रशांत बवळे, नितीन डाबरे, गणेश येडमे, मनिष ठाकरे, किशोर कामडी, अजय बोडखे, सतिश घोडे, यशवंत कुकडे आदी पदाधिकारी सहकार्य करीत आहे.

सेलू पोलिसांचा 'दबंग' धडाका! १२ तासांत घरफोडीचा छडा

दोन आरोपी जेरबंद; चोरीचा १०० टक्के मुद्देमाल हस्तगत; १ लाख ८५ हजार ५५० रुपयांचा ऐवज जप्त



सेल / प्रशांत झाडे

केळझर येथे दिवसा घरफोडी करून सोन्याचे दागिने व रोख रक्कम लंपास करणाऱ्या दोन आरोपींना सेलू पोलिसांच्या डी.बी. पथकाने अवघ्या १२ तासांत बेड्या ठोकल्या. आरोपींकडून चोरीस गेलेले सोन्याचे दागिने, रोख रक्कम तसेच गुन्ह्यात वापरलेली मोटारसायकल व दोन मोबाईल असा एकूण १ लाख ८५ हजार ५५० रुपयांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला. या कारवाईमुळे घरफोडीचा गुन्हा अल्पावधीत उघडकीस आणण्यात सेलू पोलिसांना यश आले आहे.

दिनांक १ ऑक्टोबर २०२६ रोजी केळझर येथील रहिवासी सौ. छाया विलास तडस यांच्या राहत्या घराचे लोखंडी कपाटाचे लॉक तोडून अज्ञात चोरट्याने कपाटातील लॉकरमध्ये ठेवलेली सोन्याची पोत, सोन्याचे मणी, सोन्याचे पदक तसेच रोख २ हजार रुपये असा ऐवज चोरून नेला होता. याप्रकरणी सौ. तडस यांच्या तक्रारीवरून पोलीस स्टेशन सेलू येथे गुन्हा दाखल करण्यात आला होता. गुन्ह्याचा तपास डी.बी. पथकाचे पोलीस हवालदार अनिल केकतपुरे यांच्या नेतृत्वाखाली सुरू करण्यात आला.

तपासादरम्यान गोपनीय माहितीच्या आधारे पोलिसांनी संशयितांचा माग काढत रोशन संजयराव बोरेकर (वय २६) आणि अभिनव किसनाजी देव्हारे, दोघेही रा. वॉर्ड क्र. ४, केळझर यांना ताब्यात घेतले. चौकशीनंतर दोघांना अटक करण्यात आली.पोलिसांनी आरोपींकडून गुन्ह्यात वापरलेली काळ्या रंगाची हिरो कंपनीची स्प्लेंडर मोटारसायकल क्र.एमएच-३२ एडब्ल्यू-२८२०, एक रेडमी ५उ अँड्रॉईड मोबाईल, एक रेडमी अँड्रॉईड मोबाईल तसेच चोरीची २ हजार रुपयांची रोख रक्कम जप्त केली.याशिवाय ५६ सोन्याचे मणी वजन १.९६० ग्रॅम आणि सोन्याचे पदक वजन ३.०९० ग्रॅम असा सोन्याचा ऐवजही पोलिसांनी हस्तगत केला. जप्त मुद्देमालाची एकूण किंमत १ लाख ८५ हजार ५५० रुपये असल्याचे पोलिसांनी सांगितले.

विशेष म्हणजे, पोलिसांनी चोरीस गेलेला १०० टक्के मुद्देमाल रिकव्हर करत अवघ्या १२ तासांत गुन्ह्याचा छडा लावला. पोलिसांच्या या जलद कारवाईबद्दल फिर्यादी सौ. छाया तडस यांनी पोलिसांचे आभार मानले.

ही कारवाई पोलीस अधीक्षक सौरभ कुमार अग्रवाल, अपर पोलीस अधीक्षक सदाशिव वाघमारे आणि उपविभागीय पोलीस अधिकारी प्रमोद मकेश्वर यांच्या मार्गदर्शनाखाली करण्यात आली.

कारंजा तालुक्यात दुष्काळाचा तीव्र तडाखा; संत्रा बागा धोक्यात, विहिरींनी गाठला तळ

कडक उन्हामुळे कपाशी पिके कोमेजली; खैरी कार नदी प्रकल्पात अपुरा पाणीसाठा असल्याने आगामी रब्बी हंगामही संकटात

गौरव सोमकुवर

कारंजा (घाडगे): कारंजा तालुक्यात यंदा पावसाने दगा दिल्यामुळे भीषण दुष्काळसदृश परिस्थिती निर्माण झाली असून बळीराजाची चिंता मोठ्या प्रमाणावर वाढली आहे. संपूर्ण पावसाळा उलटून गेला तरी तालुक्यात सरासरीइतका समाधानकारक पाऊस पडला नाही. त्यामुळे येथील शेतकऱ्यांचा मुख्य आर्थिक कणा असलेल्या संत्रा बागा आता पूर्णपणे संकटात सापडल्या आहेत. संत्रा पिकाचा गोडवा वाढण्याऐवजी शेतकऱ्यांच्या तोंडचे पाणी पळवणारी परिस्थिती सध्या निर्माण झाली आहे. त्यातच गेल्या काही दिवसांपासून परिसरात भर उन्हाळ्यासारखे कडक ऊन तापत असून तापमानाचा पारा चांगलाच वाढला आहे. या तीव्र उन्हाच्या झळा थेट संत्रा बागांसह संपूर्ण शेतशिवाराला बसत आहेत.



?पावसाच्या मोठ्या खंडामुळे आणि समाधानकारक पर्जन्यवृष्टी न झाल्याने तालुक्यातील भूजल पातळी कमालीची खालावली आहे. एरवी पावसाळ्यानंतर ओसंडून वाहणाऱ्या शेतातील विहिरी आताच कोरड्या पडण्याच्या उंबरठ्यावर पोहोचल्या आहेत. अनेक विहिरींनी तळ गाठल्यामुळे बागांना सिंचन करणे बागायतदारांसाठी अशक्यप्राय झाले आहे. संत्रा फळांच्या पोषणासाठी आणि वाढीसाठी सध्या झाडांना पाण्याची नितांत गरज असताना पाण्याचे स्रोतच आटल्याने झाडे कोमेजून सुकण्याची भीती निर्माण झाली आहे. उष्णतेच्या माऱ्यामुळे कच्ची फळे गळून पडण्याचे प्रमाणही वाढले आहे. दुसरीकडे कोरडवाहू शेतांची परिस्थिती अत्यंत विदारक झाली असून, उभी कपाशी कडक उन्हाच्या माऱ्यामुळे माना खाली टाकत शेतातच करपून जात असल्याचे चित्र शिवारात पाहायला मिळत आहे.तालुक्यातील शेती आणि पिण्याच्या पाण्याचा मुख्य आधार समजल्या जाणाऱ्या 'खैरी कार नदी प्रकल्पा'मध्येही यंदा अत्यल्प पाणीसाठा उरला आहे. धरण क्षेत्रात दमदार पाऊस न झाल्याने हा प्रकल्प पूर्ण क्षमतेने भरू शकला नाही. प्रकल्पात पुरेसा पाणीसाठा उपलब्ध नसल्यामुळे आगामी रब्बी हंगामावर त्याचे गंभीर सावट पसरले आहे. विहिरी कोरड्या आणि धरणातही पाणी नसल्याने रब्बी हंगामातील गहू, हरभरा यांसारख्या प्रमुख पिकांची पेरणी करायची कशी, असा यक्षप्रश्न शेतकऱ्यांपुढे उभा ठाकला आहे. आधीच खते, बी-बियाणे आणि मशागतीवर हजारो रुपयांचा खर्च करून शेतकरी कर्जाच्या ओझ्याखाली दबला आहे. त्यात आता खरीप हंगाम पूर्णपणे हातातून गेला असून रब्बीचीही आशा धूसर झाल्याने शेतकरी वर्ग हवालदिल झाला आहे. प्रशासनाने परिस्थितीचे गांभीर्य ओळखून तालुक्यातील पिकांचे तातडीने पंचनामे करावेत आणि कारंजा तालुक्यात दुष्काळ जाहीर करून शेतकऱ्यांना तातडीने आर्थिक मदत द्यावी, अशी एकमुखी मागणी संपूर्ण तालुक्यातून जोर धरत आहे.

'यंदा पावसाने पूर्णपणे दगा दिल्यामुळे परिस्थिती अत्यंत बिकट झाली आहे. झाडांवर लागलेला संत्रा जगवण्यासाठी सध्या पाण्याची अत्यंत गरज आहे, परंतु विहिरींनी आत्ताच तळ गाठल्याने बागेला पाणी कुठून द्यावे हा प्रश्न आहे. सध्या भर उन्हाळ्यासारखे कडक ऊन पडत असल्याने संत्र्याची फळे गळून पडत आहेत. बागेवर वर्षभर घेतलेली मेहनत आणि केलेला लाखो रुपयांचा खर्च डोळ्यादेखत वाया जाताना दिसत आहे. झाडे जगली तर पुढचा विचार करता येईल, पण जर झाडेच वाळली तर बागायतदार पूर्णपणे उद्ध्वस्त होईल. शासनाने परिस्थितीची गंभीर दखल घेऊन तातडीने दुष्काळी मदत जाहीर करावी.'

– नितीन कडू (संत्रा उत्पादक शेतकरी, कारंजा)

? 'खैरी कार नदी प्रकल्पात यंदा समाधानकारक पाणीसाठा झालाच नाही, त्यामुळे कालव्यांद्वारे मिळणाऱ्या पाण्याची आशा संपली आहे. विहिरींचे पाणी आटत चालल्याने संत्रा बागेला पाणी कसे द्यावे, हा मोठा पेच निर्माण झाला आहे. खरीप पिके तर कडक उन्हामुळे शेतातच जळून खाक झाली, आता रब्बीची पेरणी करणेही पाण्याअभावी अशक्य झाले आहे. डोळ्यादेखत हिरवीगार शेतं सुकताना पाहून शेतकरी हतबल झाला आहे. संकटात सापडलेल्या बळीराजाला सावरण्यासाठी प्रशासनाने कारंजा तालुक्यात दुष्काळसदृश परिस्थिती जाहीर करून शेतकऱ्यांना आर्थिक भरपाई द्यावी.'

– मोहन किनकर (संत्रा उत्पादक शेतकरी, कारंजा)